प्रकरण ४

# ‘साखरफेरा’ व ‘बुझ्र्वागमन’ या दोन्ही कादंबरीतील शेती समस्येचे स्वरूप व त्यांची चिकित्सा.

# प्रकरण ४

---

**'बुझ्र्वागमन' या कादंबरीतील शेती समस्येचे स्वरूप व त्यांची चिकित्सा.**

१) आर्थिक समस्या

२) मजुरांची समस्या

३) व्यापारी

४) संकरित बियाणे

५) जमिनीचा पोत

६) शेतकरी संघटना

७) मालक आणि नोकर यांच्यातील संबंध

८) समाजव्यवस्थेविषयी भाष्य

९) सावकार

१०) शैक्षणिक समस्या

मानवी इतिहासात शेतीची परंपरा प्राचीन काळापासून आहे. देशाचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू हे ''शेती हा मानवी संस्कृतीचा मोठा शोध आहे'' असे वक्तव्य करत असत. आपल्या देशात शेतीला अनादिकाळापासून खूप महत्त्व देण्यात आले आहे. भारत हा खेड्यांचा देश आहे. भारतातील ७०% लोक शेती व शेतीशी निगडीत व्यवसायावर चरितार्थ चालवितात. शेतकरी जीवनात जन्मदात्या आईला जेवढे महत्त्व असते तेवढेच महत्त्व पालन पोषण करणाऱ्या भूमी मातेला दिले जाते. म्हणून शेतकऱ्यांना भूमिपूत्र असेही म्हटले जाते. तसेच शरणकुमार निंबाळे म्हणतात, ''भारतीय जीवनाचा आधारच मुळी शेती हा आहे. यातूनच बळीराजा हे नामाभिधान शेतकऱ्यास लाभले. शेतीवर जीवापाड प्रेम करणारा ग्रामीण माणूस बराचसा दुर्लक्षित राहिला.''[१]

देशाला स्वातंत्र्य मिळून ६० वर्षे पूर्ण झाली असली तरी शेती व्यवसायात दिवसेंदिवस प्रगती न होता तो अधोगतीकडेच अधिक झुकू लागला आहे. आजचा भुमिपूत्र निसर्गाच्या लहरीपणामुळे बाजारातील शेती मालाच्या किंमतीतील चढ-उतारामुळे, व्यापाऱ्यांच्या दुरवर्तनामुळे पिकावरील रोग व किडींच्या प्रादुर्भावामुळे, श्रमिकांच्या वाढत्या मजुरीमुळे, दूरदृष्टी व डोळसपणा नसलेल्या संयोजनामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला आहे. या अडचणीवर मात करून शेतकऱ्यांचा वनवास संपविण्यासाठी काहीतरी हालचाल केली पाहिजे.

'बुझर्वागमन' या कादंबरीमध्ये दिवाकर चौधरींनी शेतकऱ्यांच्या जीवनातील समस्यांचे, शेतकऱ्यांच्या या परिस्थितीला कोणकोणते घटक जबाबदार आहेत. तसेच शेतकऱ्यांची एवढी वाईट दुर्दशा कशी झाली आहे. सरकार त्यांच्यासाठी काही जबाबदारीची भूमिका घेतय का? त्यावर काही उपाययोजना करतात का नाही? अशा अनेक प्रश्नांचा खुलासा करताना दिसतात. दिवाकर चौधरींनी शद्बबद्ध केलेल्या शेतकऱ्यांच्या समस्या या फक्त त्यांच्या खानदेशातीलच नाहीत तर पूर्वेपासून पश्चिमेपर्यंत अन् उत्तरेपासून दक्षिणेपर्यंतच्या सर्व शेतकऱ्यांच्या आहेत. लेखकांनी चित्रित केलेली शेतकऱ्यांची अवस्था ही शेतकरी कुटुंबाचे निरीक्षण करून केलेली नाही तर त्यातील बऱ्याच गोष्टी त्यांनी स्वतः अनुभवल्या आहेत ते स्वतःही शेतकरी आहेत. त्यांच्याकडे ५० एकर जमीन आहे. पण या ५० एकर जमिनीतील काही एकर जमीन वेळोवेळी शेतीत तोटा झाल्याने झालेले कर्ज भागविण्यासाठी हृदयाचा

तुकडा तोडावा तसा तोडून विकायचा आणि कर्ज भागवायचे आणि मानेतला फास बाजूला करायचा. लेखकांच्याकडे भरपूर जमीन होती. म्हणून त्यांनी ती विकली व कर्ज भागविले. अशा प्रसंगी गरीब शेतकऱ्यांची काय अवस्था होते त्यांनी काय करावयाचे. शेवटी कर्जाला आणि त्यांच्या व्याजाला कंटाळून आत्महत्या करण्याशिवाय त्यांना पर्याय रहात नाही. अशा पद्धतीने हजारो शेतकरी स्वतःच्या जीवाचा शेवट करून कर्जाच्या विळख्यातून सुटतात जीवंत राहून या कटकटींना सामोरे जाण्यापेक्षा मेलेले बरे. अशाप्रकारे आपल्या जीवावर उदार झालेला शेतकरी आपल्या निदर्शनास येतो. जणू काही शेतकऱ्यांच्या जीवाला कवडीमोलाची किंमत नाही. परंतु आपल्या या वेड्या शेतकऱ्यांच्या लक्षात येत नाही कर्जापोटी जरी स्वतःचे आयुष्य संपवले तरी समस्या मात्र तशाच रहातात. आणि पुन्हा त्याच चक्रात शेतकऱ्यांची मुले अडकतात. बापाच्या गळ्यातील फास निघून मुलाच्या गळ्यात अडकतो. शेतकऱ्यांनी कोणत्याही कारणास्तव आत्महत्येचा पळपुटेपणा न करता प्रखर संघर्ष करून धैर्याने आलेल्या संकटांना तोंड दिले पाहिजे. भविष्याला आनंदाने सामोरे गेले पाहिजे मनात जिद्द ठेऊन लढाई पुढे सुरू ठेवली पाहिजे. या घटनेचा विचार केल्यानंतर असे वाटते की हाच का आपला विकास? हिच का विकासाच्या विचारांची शोकांतिका ? नक्की कोणत्या प्रकारची प्रगती होत आहे? २१ व्या शतकात पदार्पण करत असताना देशाचा सर्वांगीण विकास न होता अल्पप्रमाणातच झाला आणि बाकीची ही जनता आजही दारिद्र्यात पिचत पडलेली आहे.

सैन्यदलातील जवानांचा मृत्यू झाल्यास त्यांचा इतमानात अंत्यविधी केला जातो. कारण ते आपल्या देशाला शत्रूपासून वाचविण्याचा आटोकाट प्रयत्न करतात. आपल्या देशाच्या बाजूने लढत असतात. ह्याच जवानांना अन्नाचा पुरवठा करण्याचे सर्वात मोलाचे काम आमचा शेतकरी करत असतो. शेतकऱ्यानी जर कसलेच धान्याचे उत्पादन केले नाही तर; हे जवान कोणत्या बळावर लढतील. तुम्ही म्हणाल; आम्ही परदेशातून धान्य आयात करू ! पण असे किती दिवस करणार ? किती लोकांना हे धान्य विकत घेऊन खायला परवडणार ? यासंदर्भात सतीश जाधव म्हणतात, ''जर शेती पिकली नाही तर जवानच नव्हे सर्व जनता अन्नावाचून मरेल.''[२] जगात शेती इतका कोणताच उद्योगधंदा महत्त्वाचा नाही किंवा जो बंद पडला अगर कमी वेळ

चालवला तर जवानांना लढण्यासाठी बळ देणारा आमचा हा बळीराजा आजच नव्हे तर पिढ्यांपिढ्या त्यांची काय अवस्था चालली आहे. शेतकऱ्यांच्या मृत्यूची कधी कोणी दखल घेते का? एखाद्या शेतकऱ्यांनी जर आत्महत्या केली तर तेवढ्यापुरते वर्तमानपत्र, टि.व्ही., रेडिओ इत्यादी प्रसारमाध्यमांमध्ये बातम्या येतात. चार दिवस लोकांमध्ये चर्चा चालते. झाले एवढीच शेतकऱ्यांची किंमत पुन्हा त्याच्याकडे कोणी लक्ष देत नाही. कुठली सुविधा त्याच्या बायका मुलांना मिळत का नाही? कित्येक सरकार आले नी गेले कित्येक पक्ष शेतकऱ्यांचे कैवारी झाले नी गेले. परंतु कोणीही कारणापलिकडे पूर्ण जबाबदारीची भूमिका स्वीकारून शेतकऱ्यांशी इमान राखून कधीही तळापासून नियोजन झालं नाही. जे झालं ते सगळे वरवरचे.

या संदर्भात डॉ. नागनाथ कोतापल्ले म्हणतात, ''आज पुन्हा एकदा शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. अक्षरशः हजारोंनी या आत्महत्या विदर्भ आणि मराठवाड्यात विशेषत्वाने घडताहेत. शासन ज्या पद्धतीने हा प्रश्न हाताळीत आहे. ती पद्धती शेतकऱ्यांच्या आत्महत्येला कारणीभूत असणाऱ्या परिस्थितीला समजून घेणारी आहे असे वाटत नाही. शेतकऱ्यांच्या आत्महत्येनंतर देऊ केलेल्या शासकीय नुकसानभरपाईतून हा प्रश्न सुटणारा नाही. शासकीय रकमेचे पॅकेजेस हा त्यावरचा अंतिम उपाय नाही हे आता शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे सत्र अजूनही थांबत नाही यातून सिद्ध झालेले आहे.''[३]

तसेच ''गेल्या वर्ष दीड वर्षात ५०० पेक्षा अधिक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. परंतु आमचे राजकर्ते गप्प आहेत. विचारवंत गप्प आहेत. वर्तमानपत्रवाले आणि त्यातल्या त्यात शोध पत्रकारितावाले गप्प आहेत. साहित्यिकही बोलायला तयार नाहीत. मग अशा वेळी काळीतून उगवलेल्या माणसाने काय करावं?''[४]

बंद वातानुकूलीत खोल्यांमधून बसून नियोजन करणाऱ्यांना प्रत्यक्ष शेतकऱ्यांची अवस्था काय आहे. तो कोणत्या प्रसंगातून जात आहे याचे सुखदुःख त्यांना काय समजणार? वातानुकूलीत खोल्यांमधून बसून अलिशान गाडीमधून फिरून, डोळ्यांना ऊन लागते म्हणून महागडे गॉगल्स वापरणाऱ्यांना रखरखत्या उन्हात रानोमाळ फिरणाऱ्या शेतकऱ्यांच्या कामाचे उत्पादनाचे किंमतीचे नियोजन कसे काय कळणार. कोणत्या मुद्यावरून शेतकऱ्यांच्या

मालाचा भाव ठरणार काही ठिकाणी शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत. दुष्काळ पडत आहे. शेतकऱ्यांच्या मालाला भाव नाही. कधी निसर्ग धोका देतो, त्यामुळे शेतकऱ्यांच्या कर्जाचा डोंगर वाढत आहे. त्यातून आत्महत्या होत आहेत. अशा अनेक कारणांनी शेतकरी ग्रासलेला आहे. तेव्हा यावर उपाय म्हणून सरकार पॅकेज वगैरे देत आहे ती मलमपट्टी आहे. वरवरची त्यातून काही साध्य होणार नाही. मृत्यूच सत्र थांबणार नाही. झालं तर वेळ मारून नेणं इतकंच साध्य होईल.

'बुझ्र्वागमन' या कादंबरीमध्ये अशा स्वरूपाचे कष्ट आले आहे. अशा या शेतकऱ्याला शेतामध्ये रात्रंदिवस काबाडकष्ट करावे लागतात. त्याची कष्टाची सोबत आजतागायत संपलेली नाही तो या कष्टाच्या बळावरच शेती पिकवत असतो. हा शेतकरी आर्थिक दृष्टीने कमकुवत असला तरी तो कष्टाच्या बाबतीत कधीच मागे हटताना दिसत नाही. कष्ट हेच त्याचे भांडवल असते. एवढे कष्ट करूनही या शेतकऱ्याच्या पदरात अपयशच पडते. त्यामुळे तो निराश होतो. याच निराशा, याच कष्टांना, समस्यांना वाचा फोडण्याचा, न्याय देण्याचे काम दिवाकर चौधरींनी 'बुझ्र्वागमन' या कादंबरीमध्ये केले आहे.

**१) आर्थिक समस्या :-**

शेतीत अस्मानी, सुलतानी संकटे, तसेच सरकारचे धोरण या गोष्टींमुळे शेती अडचणीत आली आहे. सरकार शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्या नंतर पॅकेज देते परंतु शेतकऱ्यांच्या मुलभूत समस्या सोडविण्याचा सरकारने कधीच प्रयत्न केला नाही. त्यामुळे शेतकरी दिवसेंदिवस अधिकच आर्थिक वादळात सापडत गेला. त्या वादळातून बाहेर येणे त्याला अशक्य झाले. दिवसेंदिवस तो कर्जाच्या विळख्यात अडकला. शेतकरी समाजात दारिद्र्याचे प्रमाण मोठे आहे. शेती हा मुख्य व्यवसाय मागासलेला असल्याने शेती उत्पादकता कमी होते. त्यामुळे वार्षिक उत्पन्न कमी होते. बरेच शेतकरी गरीब अल्पभुधारक, रूढीप्रिय, दैववादी आहेत. रासायनिक खते संकरीत बियाणे, सुधारित शेती औजारे, जंतुनाशके, कृत्रिम पाणी पुरवठा इत्यादीचा वापर करून आधुनिक तंत्राने शेती करतात. त्यामुळे शेती उत्पादन निघत नाही. निघाले

तर त्याला दर नाही. त्यामुळे शेतकरी अधिकच अडचणीत आला आहे. आर्थिक समस्या तर शेतकऱ्यांच्या पाचवीलाच पुजलेली ती कितीही अटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला तरी पुन्हा एखादी अडचण उभी राहून त्याचे आर्थिक नुकसान होते. या आर्थिक नुकसानीतून बाहेर येण्यासाठी शेतकऱ्यांनी काय केले पाहिजे. या संदर्भात डॉ. मुकुंदराव गायकवाड म्हणतात, ''शेतकऱ्यास पैशाची जी कोंडी आहे ती सोडविण्यासाठी आत्ताची अर्थव्यवस्था मुळीच न्याय देणारी नाही. त्यासाठी शेतकऱ्याला या कोंडीतून बाहेर काढावयाचे असेल तर शेतकऱ्यांनी स्वतः सक्षम बनले पाहिजे. आपले प्रश्न आपणच सोडविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. दुसऱ्यावर अवलंबून रहाता कामा नये.''[५]

लेखकांनी कादंबरीमध्ये मोटार बिघडण्याचा जो अध्याय सांगितला आहे तो अध्यायही शेतकऱ्याच्या आर्थिक समस्येतील एक घटक आहे. मोटार बिघडली की शेतकऱ्यांना एक वेगळेच टेन्शन येते. आपल्या सारख्याना वाटणार काय मोटर तर बिघडली घ्यायची दुरूस्त करून नाहीतर घ्यायची नवीन. त्याच एवढे टेन्शन घ्यायची काय गरज. परंतु ज्याचे जळते त्यालाच कळते, ज्याचे दुःखणे त्यालाच माहित दुसऱ्याला सांगून काय उपयोग मोटर बिघडली की शेतकरी एकदम अस्वस्थ होतो. कारण उन्हाळा सुरु झाला की मोटर बिघडायला सुरूवात, पावसाळ्यात पाण्याची आवश्यकता नसते तेव्हा मात्र विजेचा पुरवठा असतो. मोटर बिघडली की विविध शंका मनात घर करू लागतात. कारण नवीन इलेक्ट्रीक मोटर विकत घेणे काही सोपी गोष्ट नाही. नवीन इलेक्ट्रीक मोटर घ्यायची म्हटले तर १२,००० रूपये लागतात. कोरडवाहू दहा-बारा एकराचा हंगामही एवढा होत नाही. एखाद्या शेतकऱ्याजवळ पैसे असले तरी त्याला त्याचे पुष्कळ नियोजन करावे लागते. कारण शेतकरी खेड्यात रहातो तिथे इलेक्ट्रीक मोटर मिळत नाही. ते पाच-सात क्विंटलचे ओझे गाडीतून शहरात न्यायचे. त्याच कंपनीची इलेक्ट्रीक मोटर शोधायची कारण पहिल्या फाऊंडेशनला दुसऱ्या कंपनीची मोटर चालत नाही. एक मोटर बिघडली तर शेतकऱ्यांना एवढ्या समस्यांना सामोरे जावे लागते. त्यामुळे शेतकरी नवीन मोटर आणायचे रद्द करतो. पुढे मात्र एखादी ज्यादा मोटर घेऊन ठेऊ असे तो मनात ठरवितो. परंतु बिघडलेली मोटर सुरू झाली की तो नवीन मोटर आणायचे विसरतो. पुन्हा कधी मोटर बिघडली की हेच चक्र त्याच्या डोळ्यासमोर फिरू लागते. अस करता करता त्याची हयात जाते. पण त्याला काही ज्यादा मोटार घेता येत नाही. शेतकरी वेळोवेळी अशा अनेक गोष्टींचे

नियोजन करत असतो. परंतु त्या कधीच पूर्ण होत नाहीत. कारण शेतकरी नेहमीच आर्थिक टंचाईत अडकलेला असतो. प्रपंचात इकडचे ठिगळ शिवेपर्यंत तिकडे फाटलेले असते. या सर्व गोष्टी पार पडेपर्यंत शेतातील पिके तग धरत नाहीत. ती सुकू लागतात. त्यामुळे शेतकऱ्यांचे कोणत्याच कामात लक्ष लागत नाही. फक्त मोटर, मोटर एवढाच प्रश्न डोळ्यासमोर उभा असतो. आपल्यासारख्यांना वाटते काय हे पुराण एवढे सविस्तर सांगायची काय गरज आहे. परंतु एवढ सांगितल्याशिवाय तर आपल्याला प्रत्यक्षातील अवस्था काय आहे हे समजणार आहे का? मोटर बिघडणे ही गोष्ट आपल्याला क्षुल्लक वाटते पण त्यापाठीमागे असणाऱ्या समस्या प्रत्यक्षात अनुभवल्याशिवाय लक्षात येत नाहीत. किरकोळ वाटणाऱ्या गोष्टीचे महत्त्व किती आहे हे लक्षात येत नाही.

जमीन कसून शेतकरी वैतागले आहेत. परंपरेने चालत आलेला व्यवसाय ते मनापासून न करता पर्याय नाही म्हणून करत आहेत. या पाठीमागचे महत्त्वाचे कारण म्हणजे आर्थिक टंचाई. पैसा असल्याशिवाय काहीच हालचाल करता येत नाही. पैशाची गरज तर सगळ्यांनाच असते जगात त्याचसाठी तर प्रत्येकजण धडपडत आहे. कष्ट करत आहेत. इतरांपेक्षा शेतकऱ्यांची पैशाची गरज माफक आहे. इतर व्यावसायिकांसारखी त्यांना हाव नाही. दोन वेळ पोटभर जेवण, कपडालत्ता आणि दर आठवड्याच्या बाजार दिवशी मजुरांची मजुरी भागविण्यासाठी पैसे मिळाले की बस्स, तो खुष असतो. कारण मजुरांचे पैसे दिले नाही तर अंगावर काटाच येतो. बाजारच्या दिवसाच्या आधी चार दिवस त्यांच्या पैशाचा घोर लागतो. सर्व शेतकऱ्यांची व्यथा एकच. मजुरी नाही द्यावी तर मजुर गावभर इज्जतीचा पंचनामा करतात. काही शेतकरी तर त्यांच्यापासूनच व्याजाने रक्कम घेतात आणि पुन्हा त्यांनाच मजुरीचे पैसे म्हणून देतात. शेतकऱ्यांकडे मजुरी करून रोजगारी लोकांनी पैसे साठविले आणि सर्वत्र आम्ही गरीब म्हणून मिरवतात. सर्व सुख–सुविधांचा उपभोग घेतात दारिद्र्यरेषा, इंदिरा गांधी, अंत्योदय, घरकूल, राजीव गांधी इत्यादी योजनांचा लाभ घेतात. पैसे असूनही पैशांचा गाजावाजा करत नाहीत. उलट शेतकऱ्यांनाच हरबऱ्याच्या झाडावर चढवतात. तुमच्याकडे एवढी एकर जमीन आहे, मोठा वाडा, गुरे ढोरे, तुमचे पूर्वज असे होते असे म्हणून त्यालाच मोठेपणा देतात. जणू काही हे सातजन्माचे भिकारीच असल्यासारखे.

वर्षभर शेतकरी इकडचे तिकडचे पैसे उचलून शेतीत घालतो. भरघोस पीक आणतो. शेवटी

माल विकून ज्याचे त्याचे पैसे भागवून उरलेल्या पैशात हे करू ते करू असे ठरवतो. होते मात्र उलटेच जे बजेट काढलेले असते त्याच्या निम्म्याने ही पैसे येत नाहीत. मग भागवा–भागव कशी करायची पुन्हा पीक निघाल्यावर वावराची मशागत करायला पैसे लागतात ते कुठून आणायचे असे चक्र सतत फिरत रहाते. या विचाराने जीव नुसता वैतागून जातो. आलेल्या पैशाचा आकडा जरी लोकांना मोठा दिसत असला तरी त्यात घातलेला खर्च हा तेवढाच मोठा असतो. शेतकऱ्याला जर गावाला जायचे असेल तर आदल्या दिवशी त्याला वाटखर्चीला कुठेतरी पैसे बघावे लागतात. एवढी वाईट अवस्था शेतकऱ्यांची आहे. हे कोणाला पटणार आहे का? याउलट नोकरदारांचे बरे असते दररोज फक्त आठ तास काम करायचे महिन्याच्या महिन्याला अमूक एक आकडा नक्कीच मिळतो. त्यामुळे त्यांच्यावर एवढे वाईट दिवस येत नाहीत. शेतकऱ्यांचे मात्र तसे नाही वर्षभर रात्रंदिवस घाम गाळून किती रक्कम हातात येईल हे त्याला ठरविता येत नाही. कारण त्याने ठरविलेला दर थोडीच लोक देणार आहेत. बाजारपेठेमध्ये व्यापारी ठरवितो तो दर त्याला मिळत असतो.

कर्जाच्या ओझ्याखाली शेतकरी दबला आहे त्याचा शेतकऱ्यांना खूप ताण येतो. त्यामुळे त्याना दुसरे काही सूचत नाही. कर्जाच्या रकमेपेक्षा येणारे उत्पन्न जर जास्त असेल तर आपले कर्ज फिटेल याचा उत्साह तरी राहतो. तशी जर परिस्थिती नसेल तर कर्ज कसे फेडायचे या विचाराने शेतकरी एकदम अस्वस्थ होतो. त्याचे कशातच मन लागत नाही. मरायचे नाही म्हणून तो जीवन जगत असतो. समजा एखाद्या वेळेस काही कारणासाठी जमिनीचा तुकडा विकला तर गोष्ट वेगळी पण कर्ज भागविण्यासाठी विकणे म्हणजे आपल्या इतके दुर्दैवी कोणी नाही असे शेतकऱ्यांना वाटते. अशी अवस्था बऱ्याच शेतकऱ्यांची असते, पण असे म्हणताना माणसांना आपल्या डोळ्यातील मुसळ दिसत नाही; पण दुसऱ्याच्या डोळ्यातील कुसळ लगेच दिसते. त्याप्रमाणे लगेच त्या शेतकऱ्यांच्या अडचणीचा गावभर तमाशा करतात. शेतकरी जरी जमीन विकत असला तरी त्याला अंतःकरणातून खुप दुःख होत असते. कारण जमीन त्याला परंपरेने वडिलोपार्जित मालमत्ता म्हणून मिळालेली असते. वाडवडिलांनी आपल्या मुलाबाळांना नातू–परतवंडाना ठेवलेला भाकरीचा घास हिसकाविल्यासारखे वाटते. शेतकरी आपल्या जन्मदात्या आईप्रमाणे काळ्या आईवरतीही प्रेम करत असतो. आई आपल्याला जन्म देते आणि काळी आई आपले पालन पोषण करते अशा आईला

विकणे तेही कर्ज फेडण्यासाठी ही गोष्ट शेतकऱ्यांना खूप अपमानास्पद वाटते म्हणून बऱ्याचवेळी शेतकरी आत्महत्येचा मार्ग स्वीकारताना दिसतात. अशावेळी काही लोक असे म्हणतात शेतकरी आत्महत्या करतात म्हणजे ते व्यसनी असतात. मुला-मुलींच्या लग्नासाठी कर्ज काढतात. थाटात लग्न करतात. गाव जेवण घालतात. चैन करतात आणि त्यामुळे त्यांना कर्जाचे हप्ते भागत नाहीत कर्ज वाढते आणि शेवटी कर्जाला कंटाळून आत्महत्या करतात. या संदर्भात अरविंद नळकांडे म्हणतात, ''कुणी म्हणतो शेतकरी व्यसनाधीन झाला आहे. म्हणून तो आत्महत्या करतो! कुणी म्हणतो गृहकलहामुळे तो आत्महत्या करतो! कुणी म्हणतो त्याचे मानसिक संतुलन बिघडलेले आहे म्हणून तो आत्महत्या करतो! तर कुणी म्हणतो आपल्या महाराष्ट्राचे अनेक खासदार आत्तापर्यंत फक्त साधे केंद्रीय मंत्रीच झाले. जर आपल्या महाराष्ट्रातील कुणी पंतप्रधान झाले की शेतकऱ्यांच्या समस्या चुटकी सारख्या सुटल्याच म्हणून समजा! बऱ्याच शहरी महाभागांचे तर असे मत आहे की, आत्महत्येनंतर त्याच्या कुटुंबाला एक, दोन लाख रूपयांची सरकारी मदत मिळते म्हणूनही शेतकरी आत्महत्या करीत आहे. अशा या मतांच्या आणि सर्व्हेच्या गलबत्यात शासनातर्फे योजना ठरतात. पॅकेज ठरतात, त्या पॅकेजची अंमलबजावणी सुरू होते. परंतु शेतकऱ्यांच्या आत्महत्येची श्रृंखला काही केल्या थांबत नाही ही मोठीच क्लेशदायक व चिंतनीय बाब आहे.''[६]

अशी शेतकऱ्यांची क्रुर चेष्टा केली जाते. सर्वच लोक तसे असतात असे नाही. कारण कोठे जरी गेले तरी सर्वच लोक सारखे असत नाहीत. त्यातील एखादा तरी वाईट वागणारा असतो. त्यासाठी एका बरोबर सर्वांना शिक्षा देणे असे होते. शेतकऱ्यांच्या आत्महत्येसंदर्भात दिवाकर चौधरी म्हणतात, ''किसनाईची एक लॉबी तयार करा अन् जो इकात अशीन त्याले आर्थिक मदत करा, फार त त्याची चाचणी घ्या. चुकत अशीन त तसं सांगा भडल्याही हो''[७]

या सर्व गोष्टीपासून वाचण्यासाठी शेतकऱ्यांनी सर्व शेतकऱ्यांची मिळून एक संघटना तयार केली पाहिजे आणि जो शेतकरी जमीन विकत असेल त्याला सर्वांनी आर्थिक मदत करून जमीन विकण्यापासून परावृत्त केले पाहिजे. प्रत्येक शेतकऱ्यांनी जर एकमेकाला असा आधार


BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

दिला तर सर्व शेतकरी सुखी व्हायला वेळ लागणार नाही. कोणत्याही संकटाला तो धैर्याने सामोरा जाईल. शेतकऱ्यांच्या या अवस्थेबद्दल श्रीराम गुंदेकर म्हणतात, ''ग्रामीण माणूस आपल्या कुटुंबियांवर नात्यातील लोकांवर सर्वाप्रमाणे प्रेम करतो. घरादारावर प्रेम करतो. पण शेतीचा काळ्या आईचा तुकडा सावकाराने हडप केला. सडकेखाली किंवा धरणात गेला तर दुःखातिरेकाने तो वेडा होतो किंवा मरतो. शेतीची प्लॅटिंग तो पाहू शकत नाही. शेतीतील झाड, प्राणी, पक्षी यावरही त्यांचे प्रेम असते. शेतावरचा म्हसोबा हा त्याचा मार्गदर्शक आणि साथीदार असतो. देव तर असतोच असतो. अनेक श्रद्धा अंधश्रद्धा त्याने जपलेल्या असतात.''[८]

काळी आई म्हणजे त्याचे सर्वस्व असते. काळ्या आईला विकणे म्हणजे आपल्या आईला विकल्यासारखे शेतकऱ्यांना वाटते. वर्षभर कर्जवाले हंगामाची वाट बघत असतात. पैशाचे नाव काढत नाहीत. हंगाम संपत आला की लगेच शेतकऱ्यांच्या पाठीमागे लागतात. त्यांना माहित असते कोणता  हंगाम संपला कोणता यायचा आहे. कारण हंगाम सुरू असताना पैसे मिळाले तर ठिक नाही तर पुन्हा वर्षभर अडकतात. दिवसेंदिवस व्याज वाढत रहाते आणि रक्कम वाढते. शेतकऱ्यांना डोईजड होते. आत हे कर्ज कसे फिटणार एवढा पैसा कुठून आणणार त्यांची तजबीज करण्यापेक्षा स्वतःचे जीवन संपवलेलेच बरे म्हणून आत्महत्या करतात. शेतकऱ्यांच्या घरादारावर सावकार आणि जमीनदार गाढवाचा नांगर फिरवून त्यांच्या बायका मुलांचा अमानुष छळ करून त्यांना कसे मारीत असत  यांची  वर्णने  'इशारा', 'शेतकऱ्यांचा आसूड' मध्ये योग्य  शद्वात महात्मा फुले यांनी केले आहे. शेतकरी समाजाचे आर्थिक नुकसानीचे कारण सांगताना प्रा. चंद्रकांत खंडागळे म्हणतात, ''साधनांचा तुटवडा, भांडवलाचा अभाव, अज्ञान, दैववादी वृत्ती इत्यादीमुळे त्यांची शेती किफायतशीर होत नाही. वर्षभर पुरेल इतकेही धान्योत्पादन होत नाही. त्यामुळे गरजपूर्तीसाठी शेतकऱ्यांना कर्ज काढावे लागते. शेतकरी सतत कर्जात बुडालेला दिसतो. शेती निसर्गावर अवलंबून आहे आणि शेतीवर सुमारे ७५% जनता निर्वाहासाठी अवलंबून आहे. त्यामुळे ग्रामीण लोकसंख्येचा फार मोठा हिस्सा सतत दारिद्र्याने गांजलेला दिसून येतो.''[९]

### २) मजुरांची समस्या :-

शेती व्यवसायामध्ये मजुरांची उपलब्धता ही अतिशय अवघड गोष्ट झाली आहे. लेखकांनी मजुरांविषयी शद्बबद्ध केलेले मुद्दे अतिशय योग्य आहेत. कारण हे मजुर वेळेवर येत नाहीत, काम व्यवस्थित पार पाडत नाहीत त्यामुळे मालकांना त्याचा त्रास होतो. म्हणून लेखक त्यांच्या पत्नीला कल्पनाला ओरडतात. बिना कामाच्या दुध न देणाऱ्या म्हशी ठेऊ नये. तरीही लेखकांची पत्नी कल्पना ऐकत नाही. ती म्हणते, ''काहीबी बोलता त्याच्यानं बरकत रहात नाही. वाड्याले परवाबी ते गावडी इकी टाकली. मी नही सांगे. तर ते दुसरी लाल गावडी हंबरत होती रातभर. एकदम जीव गलबलला.''[१०]

शेतकऱ्यांकडे जास्त गुरेढोरे असणे श्रीमंतीचे प्रतीक मानले जाई. आताच्या काळात तसे काही राहिले नाही. कारण जास्त गुरे सांभाळणे अवघड झाले आहे. त्यांना वेळेवर चारापाणी दिला तर बरं नाहीतर उगाचच मुक्या प्राण्यांचा शाप लागायचा. एकट्या माणसाला एवढी गुरेढोरे सांभाळणे जमत नाही. म्हणून गडी ठेवला तर त्यांची वेगळीच तऱ्हा असते. स्वत:च्या मनाप्रमाणे वागणारे गडी; वर्षभराचे पैसे ठरवून अवाजवी उचल घेऊन कामाला सालगडी म्हणून राहतात. मालकाने जराजरी काही बोलले तर लगेच रागाने निघून जाण्याच्या गोष्टी करतात. जर तो निघून गेला तर मग पैसे बुडायची भीती आणि पुन्हा अचानक गडी कुठून आणायचा. एकटा मालक शेती गुरेढोरे इतर कामे पाहू शकत नाही. ''अडला नारायण गाढवाचे पाय धरी'' अशी अवस्था शेतकऱ्यांची झाली आहे. पैसे बुडण्याच्या भीतीने गप्प बसावे लागते या संदर्भात दिवाकर चौधरी म्हणतात, ''मग तुम्ही म्हणाल, तुम्हाले कायदा नही का? तुम्हन त हिशोब लिहले आहे.''[११]

हिशोब शेतकऱ्यांनी स्वतःच लिहिलेला असतो हे खरे आहे, पण कायद्याने वसुल करणे किती अवघड गोष्ट आहे. काम सोडून कोर्टाच्या फेऱ्या कोण घालणार ? शिवाय पैशाची धुळधाण. सरकारच्या दृष्टीने शेतकरीच बेकायदेशीर कारण त्यांनी पैसे दिले ते साक्षीदारांच्या सह्या न घेता जर तसे करण्याचा प्रयत्न केला तर मजुरांना वाटते आमच्यावर अविश्वास दाखवतात. पुन्हा तेच म्हणतात आम्ही काय तुमचे पैसे बुडवतोय का? मजुरांच्या पाठीमागे

युनियन असतेच. एकतर लेबर ऑफिसच्या मते हे सगळे मजुरांच्या नेहमीच्या वहीत लिहून ठेवायला पाहिजे नाही तर मग तो गुन्हा होतो. मग दर वेळेला पैसे द्या सही घ्या किती अवघड गोष्ट प्रत्येक शेतकऱ्याच्या वाट्याले हे दुखणं असतेच. मजुरांच्या बाबतीत शेतकऱ्याकडून जरा काही चुकले तर पुन्हा सगळे शेतकऱ्यांच्याच नावाने ओरडतात कारण शेतकरी श्रीमंत आहे आणि मजुर गरीब. शेतकरी श्रीमंत आहे तो फक्त नावापुरताच परंतु मजुरांच्याकडे खूप पैसा आहे. फक्त ते दाखवत नाहीत. म्हणजे त्यांचे खायचे दात वेगळे आणि दाखवायचे दात वेगळे असतात. शेतकऱ्यांच्याकडे जमीन जुमला आहे. पण तो सांभाळण्यासाठी कराव्या लागणाऱ्या कर्जाचा डोंगरही तेवढाच मोठा आहे. इतरांना फक्त शेतकऱ्यांची इस्टेट दिसते. त्यांचे कर्ज दिसत नाही. मजुरांशी जरा जरी वाईट व्यवहार केला तरी सगळेच शेतकऱ्यांच्या नावाने ओरडतात. या संदर्भात दिवाकर चौधरी म्हणतात, ''सायकलवाल्याची अन् फटफटवाल्याची टक्कर झाली की फटफटीवाला चूक. फटफटीवाल्याची अन मोटारवाल्याची टक्कर झाली की, मोटरवाला चूक अन् पायदळवाल्याशी याहिंची कोन्हाचीबी टक्कर झाली की पायदळवाला बरोबर.''(१२)

म्हणजे गरीबांनी कोणत्याही, कसल्याही चुका केल्या तरी त्या चुकीचे खापर त्यांच्या पेक्षा जो श्रीमंत असेल त्याच्यावर फोडायचे. यासगळ्या गुंत्यात अडकण्यापेक्षा सगळी कामे आपली आपण करायची मजुर ठेवायचे नाहीत. त्यामुळे ह्या कटकटीही मागे लागणार नाहीत कसलीच काळजी करण्याची गरज नाही. शिवाय मजुरीचे पैसेही वाचतील. असे फक्त बोलायला सोपे असते. प्रत्यक्षात एकटाच माणूस सर्व कामे करू शकत नाही. त्याने घरातले गुराढोरांचे उरकले तर तो शेतात जाऊ शकणार नाही. आणि शेतात गेला तर जनावरे उपाशी इतरही अनेक कामे असत मग त्या एकट्या शेतकऱ्याने कुठे म्हणून बघायच समजा एखाद्या शेतकऱ्याकडे ५ बिघे जमीन आहे. त्यात त्याने बिघाभर ज्वारी पेरली आहे. त्या ज्वारीची राखणी, खुडणी, मळणी, बांधणी तो एकटाच करू शकत नाही. त्यालाही मजुर सांगावेच लागतात. तो एकटा ही सर्व कामे करू शकत नाही. समजा जर एकटाच करत बसला तर बाकीची जमीन कोण बघणार फक्त जमीनदार शेतकऱ्यांचीच ही अवस्था आहे असे नाही तर अल्पभूधारक शेतकऱ्यांनाही या समस्यांना सामोरे जावे लागते. आजकाल तर या रोजगाऱ्यांना कंटाळून

अल्पभूधारक शेतकरी आपापसात पैरा करू लागले आहेत. त्यामुळे त्यांचा रोजगाऱ्यांचा प्रश्न मिटला आहे.

विहिरीतली मोटर बिघडल्यानंतर दुरूस्त करायला काढताना विहिरीत उतरलेले रोजगारी गडी, वरती येईपर्यंत मालकाला खूप काळजी वाटते. कारण काही वेळा तर ही मंडळी दारू पिऊन विहिरीत उतरतात सगळी माणसं विहिरीतून वरती आल्यावर मालकाच्या जीवात जीव येतो. कारण काही कमी जास्त झाले तर दिवाकर चौधरी म्हणतात, ''मास्टर इज लायेबल फॉर द ॲक्ट ऑफ सर्व्हंट''[१३]

काहीवेळा तर ते स्वतःच्या हलगर्जीपणामुळे पडतात आणि कायदा मात्र त्यांच्याच बाजूने बोलतो त्याची बायको आणि वाड्यातले लोक ओरडत लगेच येतात. मग ते पण असे बढाया मारतात की बोलायचे काम नाही जणू काही पैशासाठीच त्यांचा एवढा दंगा चाललेला असतो. मेलेल्या व्यक्तिचे दुःख कमी. मेला तो गेला अशी अवस्था असते. मालकांकडून चार पैसे नुकसान भरपाई घेण्यासाठी एवढा दंगा चाललेला असतो. त्यांना कितीही समजावून सांगितले तरी ऐकत नाहीत. पुन्हा तिथ श्रीमंत, गरीब प्रश्न उभा असतो. त्यामुळे जास्त काही बोलता येत नाही. नाहीतर लगेच पेपरवाले, टि.व्ही.वाले, पुढारी, ओरडायला रिकामे गरिबांवरती अत्याचार करतात. त्यापेक्षा शेतकरी घरच्या घरी दंगा न करता ही गोष्ट मिरवतात. बरं या गरिबांच्या विरूद्ध असणारा श्रीमंतवर्ग म्हणजे कोण तर शेतकरी खरचं हा शेतकरी श्रीमंत आहे. खरचं तो गरिबांवरती अत्याचार करतो का? असे अनेक प्रश्न निर्माण होतात. बरं विहिरीत ती व्यक्ती पडली तर ती कशी पडली याचा विचार न करता ज्या शेतकऱ्याच्या विहिरीत पडली त्याच्या नावाने खडे फोडत बसतात. कोणत्या तरी शेतकऱ्याला वाटेल का आपल्या विहिरीत कोण तरी पडून मरावे. असे घडल्याने आयुष्यभर एकच गोष्ट ऐकायला लागते अमक्या तमक्याच्या विहिरीत अमूक व्यक्ती पडून मेली त्या विहिरी जवळ गेले की त्याला आठवण येते. आयुष्यभर एक कलंक लागल्यासारखे होते जणू काही शेतकऱ्याने पापच केले आहे. गावातल्या कटकटी मिटवेपर्यंत पोलीसांचा पंचनामा पाठीमागे लागतो, मरणारा मरतो पण इतरांना घोर लावून जातो. त्या व्यक्तिच्या घरच्यांना व पोलीसांना चार पैसे दिले की



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

सगळे काही शांत, म्हणजे या लोकांचा दंगा पैशासाठी होता की; मेलेल्या माणसाविषयी होणाऱ्या दुःखासाठी? पोलीस कोणतीही केस तिथल्या तिथं कशी बंद करायची हे चार पैसे दिले की समजतात.

शेतकऱ्यांच्या पाठीमागे एक झालं की एक पुराण सुरू असतंच. लेखकांनी ज्वारी राखायला एका म्हाताऱ्याला सांगितले होतं. मोटर बिघडल्यामुळे लेखक तिकडे जाऊ शकले नाहीत. शेतकऱ्यांचे हे वैशिष्ट्यच आहे. जिकडे पिक चांगलं नसेल तिकडे शेतकऱ्याला जावेसे वाटत नाही. वास्तविक आपल्या सारख्याला वाटते उलट जिकडे काही अडचण असते तिकडे गेले तर, त्यात काही सुधारणा होऊ शकेल; पण ती एक मानसिकता आहे. शेतकऱ्यांवरती नेहमी दडपण असते. सारखा सारखा विचार करण्याने शेतकरी एकदम बधिर होतो. या संदर्भात दिवाकर चौधरी म्हणतात, ''बाग हा मुख्य आयटम. कर्ज फेडायचाबी जिवारी कर्ज फेडू शकत नाही. पोते गैऱ्हे राहता पण हातात झाटा राहतो. तरीबी किसान पेरतो. मंग का दरवर्षी बागच लाईन. बागावऱ्हं बाग लावता येत नही. त्याच्यानं वावर पांचट होत. त्याच्यानं दोन दानेबी घरात राहतीन अन् चाराचुराबी हुईन या इराद्यानं तो जिवारी पेरतो.''[१४]

लेखकांनी एका म्हाताऱ्याला ज्वारीची पाखरं राखायला सांगितले होते. पण कशाच काय आणि फाटक्यात पाय अशी अवस्था शेतकऱ्यांची होते. ज्वारीची पाखरं राखायला ठेवलेल्या म्हाताऱ्याने नीट काळजीपूर्वक पाखरे न राखल्यामुळे सगळी ज्वारी पाखरांनी खाल्ली. फक्त रिकामी कणसे कुठेतरी ज्वारी दिसत होती. हे दृश्य बघून लेखकांना खूप वाईट वाटते. पण काय करणार मनमोकळेपणाने ढसाढसा रडताही येत नाही किंवा त्या व्यक्तीला मारताही येत नाही. रडावं तर प्रतिष्ठा कमी होती. मारावं तर ते शोभत नाही. शेजारचा शेतकरी अशी स्थिती पाहूनही त्याची तक्रार त्या शेतकऱ्यांकडे करत नाहीत. कारण एका शेतकऱ्यांकडे मजुरांच्या काम चुकारपणाची गोष्ट दुसऱ्या शेतकऱ्यांना सांगण्याची हिंमत नाही. कारण आपल्याला त्या मजुराची पुन्हा कधी गरज लागेल हे सांगता येत नाही. त्यावेळी तो आपल्याकडे येणार नाही. मजुरांनाही शेतकऱ्यांच्या मालमत्तेची गरज नाही. आला दिवस भरणे एवढेच आपला पगार मिळाला की झालं शेतकऱ्याचे तिकडे काही का होईना.

शेत राखणे हे काम वाटते इतके सोपे नाही. परंतु सिनेमामध्ये नट–नट्या गाणं म्हणत नाचत–बागडत शेतातील पाखरांच्या मागे धावत असतात. अशी दृश्य बघुन शहरातील लोकांना शेत राखण्याचे महत्त्व समजत नाही. शेत राखणे म्हणजे सिनेमात बघितल्या सारखे हसत–खेळत मजा करत पाखरे हुसकावणे सोपे, परंतु प्रत्यक्षात शेतातील धान्य राखताना काय कष्ट आहे ते शेत राखणाऱ्या शेतकऱ्यालाच माहीत. तेल गेले; तुप गेले हाती राहिले धुपाटणे. अशी अवस्था शेतकऱ्यांची होते. याचे भान मजुरांना नसते. काहीही झालं तरी त्यांचा पगार चालूच राहतो. शेतकऱ्यांचे किततीही मोठे नुकसान झाले तरी ते आपल्या पगारातील एक रूपयाही कमी करत नाही. अशावेळी शेतकरी काही बोलला तर रागाने निघून जातो. त्यांना काय इथे नाही तर तिथे लगेच मालक बदलतात. पण कामात काही सुधारणा करीत नाहीत. नवीन मालक सुरूवातीला त्यांच्याशी खूप गोड बोलतो जेणे करून आपल्याकडे तरी चांगले काम करतील. परंतु, 'जित्याची खोड मेल्याशिवाय जात नाही' या म्हणीप्रमाणे त्यांना एकदा लागलेली सवय कशी मोडणार. कितीतरी शेतकरी अशा अनेक कटकटींना सामोरे जात जीवन जगत आहेत, आणि इतके होऊनही शेतकऱ्यांवर अन्याय होतोय, असं म्हणण्याची आपल्याकडे ताकद नाही. या अशा गोष्टींना कंटाळून त्या समस्यांना एकजुटीने सामोरे जाण्यासाठी शेतकऱ्यांकडे एकच पर्याय आहे. तो म्हणजे शेतकऱ्याची शेतकरी संघटना असली पाहिजे.

प्रत्येकजण म्हणतात शेतीच्या नुकसानीला निसर्गच जबाबदार आहे. परंतु सर्वात जास्त जबाबदार आहे तो म्हणजे मजूर देशात ८०% लोक शेतकरी आहेत. विचारांती लक्षात येते शेतकऱ्यांपेक्षा शेतमजुरांचीच संख्या जास्त आहे. या देशातला मजुर जास्त काम करण्याच्या नादाला लागत नाही, आणि तसे म्हणण्याचीही कोणाची ताकद नाही. कोण काय म्हणेपर्यंत लगेच युनियनचा धाक दाखवायला रिकामे. मग तो कोणताही मजुर असो किंवा औद्योगिक मजुर वा कोणताही मजुर श्रम न करता पैसा मिळाला पाहिजे. मग मालकाचे तिकडे किती का तोटा होवो अथवा फायदा याचे त्यांना सोयर सुतक नाही. मजुरांना काय; एक मालक डबघाईला तर दुसरा, पण परंतु मालकांना तसे करता येत नाही आपला व्यवसाय बंद

ठेऊन चालत नाही. मजुर मंडळी एवढी बिघडण्याचे कारण मालकच आहेत. कारण मालक एवढे ऐतखाऊ प्रवृत्तीचे झालेत त्यांना स्वतःकाम करणे अवघड वाटू लागले आहे. याच संधीचा फायदा मजूरांनी घेतला आहे. शेतकऱ्यांपेक्षा मजुरच श्रीमंत होऊ लागलेत. शेतकऱ्यांच्याच शेतात कामाला जाऊन मालकांना व्याजाने पैसे देऊ लागले आहेत. काही मजुरांच तर बँकेमध्ये मुदतवाढी वरती पैसे ठेवले आहेत. महागाई वाढली की इकडे लगेच मजुरी वाढली का तर महागाईमुळे आम्हाला परवडत नाही. इकडे मालकाला परवडते का? त्याच्या मालाला दर मिळाला का? याचा विचार कोण करते.

आठवड्याच्या बाजारदिवशी तर शेतकऱ्यांच्या अंगावर काटाच येतो. मजुर मजुरी मागायला आल्यावर केव्हा एकदा त्याला त्याचे पैसे देऊन नजरेआड करतो असे होते. मजुरांचा संबंधच येऊ नये असे वाटते पण काय सकाळी उठल्यापासून संध्याकाळी झोपेपर्यंत त्यांचे दर्शन होत असते. या गोष्टीला पर्याय नाही. कारण मजुरांशिवाय शेतकऱ्यांची इकडची काडी तिकडे होत नाही. या अशा गोष्टीमुळे शेतकऱ्यांची शेतीवरची निष्ठा कमी झाली आहे. काही जरी झाले तरी सुधारणा नाही. या भ्रमात ते अडकले आहेत.

शेतीत कामाला मजुर कमी लागेल किंवा लागणार नाही अशी स्वयंचलित यंत्रे (ॲटोमॅटिक मशिनरी) त्यांना पाहिजे. हळूहळू त्या पद्धतीची मशिनरी येऊन आजच्या या आधुनिक युगात शेतीची बरीच कामे यांत्रिकीकरणाच्या माध्यमातून होऊ लागली आहेत. या मशनरींचा खर्च खूप असतो तो शेतकऱ्यांना परवडत नाही. त्यामुळे तंत्रज्ञानात खूप प्रगती होऊनही मजुरांची शेतीला आवश्यकता भासत आहे. या संदर्भात डॉ. बी. बी. पवार म्हणतात, ''मजुर वेळेवर कामावर हजर होत नाहीत. मनापासून काम करणारे मजूर फार कमी असतात. जेव्हा मजुरांना कामाची खरोखरच खूप निकड आहे. त्याचवेळी रोजगार हमीची कामे सुरू करावी. अनेक शेतकऱ्यांपेक्षा मजुरच जास्त सुखी दिसतात. सामान्य शेतकऱ्यांना यंत्रे परवडण्यासारखी नाहीत.''[१५] सुरूवातीला हार्वेस्टिंग मशिन आले तेव्हा शेतकरी खूप आनंदी होता कारण त्या मशिनला मजुरांची अजिबात गरज नव्हती. कोणतेही पिक लगेच काढून मळून पोत्यात भरले जाई. झटपट शेतकरी मोकळा होई. त्यामुळे मजुरांना वाईट वाटे. मजुर शेतकऱ्यांना म्हणत. शेतकरी आता मातलेत.

मशिनमुळे धान्याचे खूप नुकसान होते. तर शेतकरी खूप आनंदी वाटे तो म्हणे. मजुरांचे पाय धरण्यापेक्षा हे बरे. विना काळजीचे कमी वेळात धान्य एकदम पोत्यात त्यामुळे शेतकरी थोडासा सुखावला. अशाच जर नवनवीन मशिनरी आल्या तर आपले कसे होणार या विचाराने मजुर चिंतेत पडला आहे.

शेतकरी शेतात काम करणाऱ्या मजुरांना आठवड्याच्या बाजार दिवशी पैसे देतात. त्या दिवशी शेतकऱ्यांच्या घरी दंगाच असतो. कारण गड्यांचा रोज ठरलेलाच असतो. त्यामुळे ते पैसे घेऊन पटकन निघून जातात. एखाद्या वेळेस कमी जास्त असले तरी दंगा करत नाहीत, समजून घेतात. परंतु, बायका मात्र हुज्जत घातल्याशिवाय जात नाहीत. दर आठवड्याला यांना वाढती हजरी पाहिजे असते. मालकीणीने नाही म्हटले तर, अमक्या तमक्याने एवढे पैसे दिले ! मग तुम्ही का देत नाही ? असे म्हणून भांडत बसतात. आठवड्याचा बाजार म्हटलं की मजुरी भागविण्याची खूप काळजी वाटते शेतकऱ्यांकडे पैसे असले तर बरे. नाहीतर पैसे कुठून आणायचे या विचाराने जीव मेटाकुटीला येतो. बरं यांना नाही म्हणावे तर गावभर बदनामी. वेळेवर पैसे देत नाही म्हणून नंतर कामाला येताना आढेवेढे घेतात. काही तर येतच नाहीत. त्यामुळे काहीही करून होत्याचे नव्हते करून बाजार दिवशी पैसे हे शेतकऱ्याला भागवावेच लागतात. तो त्याच्या प्रतिष्ठेचाही प्रश्न असतो.

शेतमजुरांच्या मध्ये बायका खुप कामचुकार असतात. एखाद्याच्या रानात भांगलायला गेल्या तर अळम-टळम करत काम करतात. एखादी जर प्रामाणिकपणे पटपट भांगलून पुढे जात असेल तर लगेच पाठीमागची तिला ढेकूळ फेकून मारते आणि म्हणते. मालक तुला जास्त पगार देणार आहे का? एवढी गडबड करती आहेस. त्यांच्या चाललेल्या खाणा खुणा मालकांच्या लक्षात येतात पण काही बोलावे तर पुन्हा कामावर येणार नाहीत म्हणून मालक शांत रहातो. काहीही करा पण हे काम संपवा एवढे खरे, अशी शेतकऱ्यांची मानसिकता झालेली असते. या संदर्भात दिवाकर चौधरी म्हणतात, ''बाया पहा का मानंस पहा, सगळी सारखी सिस्टिम नही; म्हणजे वाग्याची तऱ्हा एखादा बिचारा बरं काम कऱ्याले लागला तर दुसरा लगेच म्हणतो, तुले का मालक गोंडल्याची टोपी घालणार आहे.''[१६] या मजुर स्त्रिया अस भांगलतात दुसऱ्या

दिवशी जाऊन पहावे तर तन तसेच उभे वरच्या वर कुरतडून घेतलेले असते. त्यामुळे दुसऱ्या दिवशी ते पुन्हा उभ रहात. भांगलण्याची त्यांची अशी पद्धत असते काही म्हणावे तर पुढचे उत्तर त्यांच्याकडे तयारच असते. वावर कठीण आहे. त्यामुळे भांगलायला गेले ते ते तण तुटून हातात येते. त्याला आम्ही काय करणार. काही बायका तर भांगलताना मध्येच पाणी प्यायला उठणार, गुरांना वैरण घालायला उठणार, जेवायला सुट्टी करणार, नुसता टाईमपास करणार तेच काम त्यांना अंगावर दिले तर कमीच कमी वेळेत जीवाचे रान करून पूर्ण करतात. आणि जास्त हजेरी पाडतात. याच जोमाने जर त्यांनी शेतकऱ्याकडे कामाला आल्यावर काम केले तर शेतकऱ्याचे भले होईल पण असा विचार कोण करतय. जो-तो आपल्याच स्वार्थाचा विचार करतो.

गुराढोरांवरती शेतकऱ्याचे खूप प्रेम असते. त्यांच्या शिवाय शेतकऱ्याला शोभा नसते, बैलजोडी, गाई, म्हशी, शेळ्या म्हणजे शेतकऱ्याची संपत्ती होती. आजची परिस्थिती बदलली आहे. गुरेढोरे सांभाळायला शेतकऱ्यांना नकोसे वाटते कारण त्यांची व्यवस्था करायला मजुर मिळत नाहीत. मग एकटा शेतकरी इतर कामे बघून जनावरांची किती व्यवस्था करणार आहे. एखादा सालदार गडी ठेवला तर तो तरी कुठे मन लावून कामे करतो. वैरण घातली तर घातली, नाहीतर वैरण संपेल म्हणून मालकाच्या समजुतीसाठी थोडीच टाकायची. पाणीही वेळेवर पाजायचे नाही. मग त्या कशा दूध देणार. बिना दुधाच्या भाकड म्हशी सांभाळण्यापेक्षा आपल्याला जेवढे शक्य तेवढ्याच सांभाळलेल्या बऱ्या म्हणून शेतकरी जनावरे कमी सांभाळू लागले आहेत. मालकांच्या पेक्षा आता मजुरांकडे गुरांची संख्या वाढू लागली आहे. मजुरांना जमिनीचा तुकडा देखील नसताना किंवा ज्याच्याकडे आहेत. त्या मालकांच्या गुरांच्या पेक्षा मजुरांची गुरे खाऊन पिऊन तर असतात, आणि मालकांची गुरे मात्र एवढी जमीन असून कंबर तोलताना दिसतात. काय न्याय आहे हा दिवसेंदिवस सर्व परिस्थिती बदलू लागली आहे. मालक झालेत नोकर आणि नोकर झालेत मालक असा जमाना आला आहे.

जमीन जरी शेतकऱ्यांच्या मालकीचे असले तरी बांध मात्र मजुरांच्या मालकीचे असल्यासारखे मजुर वागतात. जणू काही शेतकऱ्यांच्या बांधावरचे गवत न्यायचा परवाना

सरकारने त्यांना दिला आहे. शेतकऱ्यांच्या जनावरांना जे मिळत नाही ते मजुरांची जनावरे खात असतात. मजुर मंडळी म्हणतात आम्ही फक्त गवतच नेतो बाकी कशाला हात लावत नाही. परंतु खरी परिस्थिती अशी नाही. शेतकऱ्याने घरखर्चापुरता लावलेला भाजीपाला सुद्धा राखत नाहीत. त्यावरही तुटून पडतात. जणू काही त्यांच्याच मालकीचा असल्यासारखाच भाजीपाला नेऊ नका म्हटले तर त्यांना राग. परत कामाला न येण्याची भीती. तोंड दाबून बुक्क्यांचा मार अशी शेतकऱ्यांची अवस्था या मजुरांनी केली आहे.

पूर्वीच्या काळी अशी परिस्थिती नव्हती पूर्वीचे मजुर प्रामाणिक, कष्टाळू होते. जीवापाड कष्ट करत होते. मालकांचे हित जाणत होते. मालकांचे काम म्हणजे आपलेच काम असल्यासारखे विश्वासाने करायचे. आता मात्र मजूरांची नियत बिघडली आहे. आजकाल सर्व कामे आधुनिक तंत्रज्ञानाने होऊ लागली आहेत. त्यामुळे मजुरांची कामे कमी झालीत. सालदार गडी तर कंबरेवरती हात ठेऊन फक्त देखरेख करत असतात. जणू काही हेच मालक असल्यासारखे आधुनिक तंत्रज्ञानामुळे माणसांची श्रमशक्ती वेळ वाचला आहे. सर्व कामे मजुरांच्या, बैलांच्या सहाय्याने होत होती. आता ती कोणत्याही कष्टाशिवाय कमी वेळात आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने होऊ लागली आहेत. यंत्राचा वापर सर्व शेतकऱ्यांना परवडत नाही. जोपर्यंत शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती सुधारत नाही. तोपर्यंत ही यंत्रणा शेतकऱ्यांना परवडणार नाही. त्यामुळे आजही शेतीकामासाठी मजुरांची आवश्यकता भासते. आजचे मजुर पूर्वीच्या मजुरांसारखे असते तर शेतीची भरभराट व्हायला वेळ लागणार नाही. शेतकरी सुखी होईल व मजुरही सुखी होतील कोणीही शेतकऱ्यांना नुकसानीचे कारण मजुर आहेत असे म्हणणार नाही. मजुरांची अवस्था म्हणजे नाका पेक्षा मोती जड अशी झाली आहे. मजुरांनी शेतकरी बांधवाना खुप अडचणीत आणले आहे. अधिच शेतकरी आर्थिक नैसर्गिक संकटामध्ये पूर्ण पिळून निघाला आहे. त्यात भरीस भर म्हणून मजुर.

**३) व्यापारी समस्या :-**

शेतकऱ्यांच्या जीवनामध्ये अनेक समस्या आहेत त्यातील व्यापारी समस्याही अतिशय

बिकट समस्या आहे. व्यापाऱ्यांच्यामुळे शेती व्यवसाय अडचणीत आला आहे. कारण शेतकरी अत्याधुनिक तंत्राचा वापर करून भरघोस उत्पादन काढतो आहे. परंतु त्याला योग्य दर मिळत नाही. याला कारण म्हणजे व्यापारी शेतकऱ्यांच्या मालाला योग्य दर देत नाहीत. त्यामुळे शेतकरी दिवसेंदिवस अडचणीत येऊ लागला आहे. या व्यापाऱ्यांनी शेतकऱ्यांना आजच कोंडीत पकडलेले आहे असे नाही तर देशाला स्वातंत्र्य मिळाल्यापासून त्यांनी शेतकऱ्यांना फसविले आहे. मग आपल्यासारख्यांना प्रश्न पडेल त्यापूर्वी शेतकरी काय करत होता. पूर्वी गावोगावी वस्तूची देवाण-घेवाण करून व्यवहार चाले. त्यामुळे शेतकरी स्वावलंबी होता. कोणत्याही वस्तू विकण्यासाठी त्याला बाजारात जावे लागत नव्हते. परंतु आता शेतकऱ्यांना मार्केट शिवाय पर्याय नाही. तसेच माल जास्त दिवस टिकूनही राहू शकत नाही. तसेच मालही खूप असतो अशा अनेक बाबींचा फायदा घेऊन व्यापाऱ्यांनी शेतकऱ्यांना वेळोवेळी देशोधडीला लावण्याचे प्रयत्न केले. त्यांच्याच जीवावर दलाली खाऊन मालोमाल झाले. या गोष्टीपासून शेतकऱ्यांचा बचाव करण्यासाठी सरकारने शेतकऱ्यांना चांगली बाजारपेठ निर्माण करून देऊन त्यांच्या मालाचा दर त्यानेच ठरवून माल विकला पाहिजे. मध्ये इतर कोणीही येऊ नये. तरच मालाला योग्य दर मिळून शेतकरी सुखी होईल.

शेतकरी शेतामध्ये धान्य, भाजीपाला, फळे, फुले इत्यादी अनेक गोष्टींची लागण करत असतो. शेती उत्पादनाचा सगळाच माल बाजारपेठेकडे विकण्यासाठी नेला जातो. परंतु काही व्यापारी हा माल थेट शेतातून उचलतात. तेव्हा ते शेतकऱ्यांची खूप फसवणूक करतात. शेतातील माल विकताना शेतकरी शेतात स्वतः हजर रहात नाही. गड्यांना पाठवितात. कारण स्वतःच्या नजरेसमोर स्वतःची झालेली फसवणूक पहाण्यापेक्षा घरी बसलेले बरे असे त्याला वाटते. त्यामुळे मनाचे खोटे-खोटे तरी समाधान होते. शेतात येणाऱ्या व्यापाऱ्यांचे वजन काटे प्रमाणित नसतात. वजन काटे योग्य वजन केलेले दाखवत नाहीत. हे आपल्याला माहित असूनही काही बोलता येत नाही. कारण पुन्हा त्यांची गरज असते. समजा एखाद्या शेतकऱ्याने धाडस दाखवून; एका व्यापाऱ्याचा वजन काटा दुसऱ्या व्यापाऱ्याकडे तपासायला नेला तर ते व्यापारी दुसऱ्या व्यापाऱ्याला लगेच फोनवरून सूचना देतो. इतरांना दाखवायला फक्त

त्यांच्याकडे स्पर्धा असते. आतून मात्र दोघेही एकमेकांना सामील असतात. तु ही खा मी ही खातो. कशाला उगीचच उचापती. एकानं जास्त भाव दिला तर दुसरा लगेच त्याला गप्प बसवतो. दरात कमी जास्त होतेच पण या सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे मालाचे वजन करणारी व्यक्ती सर्वात विश्वासाची हवी. कारण वजन १० किलो असेल तर तो सात–आठ किलोच सांगतो. कारण व्यापाऱ्याने त्याचा खिसा आधीच भरलेला असतो. त्यामुळे त्याचे काय जाते खोटे बोलायला. नुकसान होते ते शेतकऱ्यांचे शेतकरी तरी कोणा कोणाजवळ माणसे उभी करणार, वजन काट्याजवळ, वाहणाऱ्याजवळ, कटरजवळ, व्यापाऱ्याने सगळ्यांनाच मालामाल केलेले असते. त्यामुळे ते फक्त शेतकऱ्यांच्याच बाजूने बोलतात. काम मात्र व्यापाऱ्याच्या पद्धतीने करतात. कारण त्यांना रोजगार व ज्यादा पैसे मिळाल्याने, त्यांचा खिसा गरम झालेला असतो. आजकालचा जमानाच तसा झालेला आहे. कोण विश्वासाचे राहिलेले नाही. जो–तो आपल्या पुरताच विचार करू लागला आहे.

मोठ्या व्यापाऱ्यांना कंटाळून शेतकऱ्यांनी जर छोट्या व्यापाऱ्यांना बोलवले तर ते व्यापारी शेतकऱ्यांच्याकडे माल घेण्यासाठी येत नाहीत. कारण त्यांच्या मते गाडी, मजुर, वजनकाटा या सर्व गोष्टी जमा करण्यापेक्षा सरळ मोठ्या व्यापाऱ्यांकडून माल घेतलेला बरा. अशा समस्यांमुळे शेतकरीही मोठे व्यापारी म्हणतील त्या दराला आपला माल विकतात. जास्त अडून बसावं तर तो निघून जाईल. पुन्हा दुसरे गिऱ्हाईक मिळे पर्यंत माल पुढे जातो. मग त्याला हवा तसा दर मिळत नाही. मालाची नासधूस होते. त्यामुळे जेवढे पैसे व्यापारी देत असतो. तेवढेच घेऊन शेतकरी समाधान मानतात. एवढ्या मालाचे एवढे रूपये होणार अशी अपेक्षा शेतकऱ्यांनी बाळगलेली असते. त्याच्या निम्म्यानेही पैसे होत नाहीत. त्यामुळे शेतकऱ्यांनी ठरविलेल्या अंदाजाएवढे पैसे मिळत नाहीत. त्यामुळे त्यांच्या मनांत सतत; बँकेला हे पैसे द्यायचे का सावकाराला द्यायचे? का सोने गहाण ठेवलेले तिकडे द्यायचे? कसे काय फिटणार एवढे कर्ज? हे प्रश्न त्याच्या मनांत सतत येत असतात. अशा प्रकारे शेतकऱ्यांची निराशा होते. म्हणून लेखक दिवाकार चौधरी म्हणतात, ''आपल्या देशाच्या भाषेत सांग्याचं म्हणजे कोणच्या का जातचा बेपारी अशेना. खरी राष्ट्रीय एकात्मता या गधडीच्याई मधीच सुपडासाफ करणे हा याहींचा धर्म. या गधडीच्याईन काहीनच पनपू देत नही किसानाईले.''(१७)

अशा व्यापाऱ्यांच्या वागण्यामुळे शेतकऱ्याला शेती करण्यात रस राहिला नाही. स्वतः काबाड कष्ट करून पिकवलेला माल स्वतः किंमत न ठरवता व्यापारी म्हणेल त्या किंमतीला विकावा लागतो. मालाची किंमत करायला त्या व्यापाऱ्यांनी किती कष्ट घेतलेत काय हक्क आहे. ज्याने उन्हातान्हात कष्ट करून माल पिकवला त्याचा मात्र त्याच्यावर काहीच अधिकार नाही. या संदर्भात प्राचार्य रा. र. बोराडे म्हणतात, ''शेतमालाचं उत्पादन करणारा शेतकरी हा एकच घटक या देशात आहे की त्याला आपल्या उत्पादनाचा खर्च काढता येत नाही या उत्पादनावर किती कमिशन द्यायचे हे ठरविण्यासाठी त्याला अधिकार नाही अथवा या उत्पादनावर किती नफा पाहिजे आहे, हेही त्याला ठरविता येत नाही. आणि म्हणूनच तो सर्वच स्तरावर शोषणाचा बळी ठरत आहे. शेती मालाचं उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्याला उभ्या आयुष्यात स्वतःची बैलजोडी उभी करणं शक्य होत नाही. याच शेतकऱ्यांच्या शेतीमालाचा व्यापार करणारा व्यापारी अगदी सहजगत्या अँबॅसिडर कार विकत घेतो ही विदारक जाणीव याच काळात माझ्या मनावर ठसली.''[१८]

व्यापारी मात्र फॅनच्या थंडगार वाऱ्याला बसून, शेतकऱ्यांच्या जीवावर मजा मारतात गाड्या घेतात. स्वतःचे चोचले पुरवतात. इतर कोणतेही उत्पादनाचे साधन नसतात. फक्त शेतकऱ्यांचा माल खरेदी करून तो बाजारपेठेत नेऊन विकायचा एवढ्या व्यवसायावर ते मालामाल झालेत हे सर्व व्यापारी एकमेकांना सामील आहेत. सर्वजण मिळून शेतकऱ्यांना कोंडीत पकडतात. व्यापारी शेतकऱ्यांच्या जीवावर बंगले बांधू शकतात गाड्या घेऊ शकतात. शेतकरी मात्र साधी सायकलही घेऊ शकत नाही. घराची डागडूजी करण्याइतपत पैसेही त्याच्या वाट्याला येत नाहीत. शेतकऱ्यांच्या जीवावर व्यापारीच काय शेतीसाठी इतर जे साहित्य लागते ती सर्व मंडळी शेतकऱ्यांची याच पद्धतीने पिळवणूक करत असतात. त्यातील एखादा शेतकरी दुकानदार ही असतो. तो देखील आपल्या बांधवांच्या विषयी सहानुभूती दाखवत नाहीत. इतर व्यापाऱ्यांसारखा तो देखील पुरेपूर शेतकऱ्यांची फसवणूक करतो. सर्वच शेतकरी सुशिक्षित नाहीत. जरी असले तरी त्यांना फसवायलाही हे लोक कमी करत नाहीत. एम्. एस्सी. अॅग्री झालेले लोक खते, बियाणे, किटकनाशके यांची दुकाने घालतात. आपल्या दुकानातील माल विकला जावा

यासाठी आपले तत्वज्ञान शेतकऱ्यांना अवजड भाषेत सांगत असतात. हे बियाणे वापरले की अमुक इतकी पोती धान्य निघेल, या खतामध्ये एवढी ताकद आहे; त्यामुळे जमीनीचा पोत ही सुधारतो इत्यादी माहिती सांगून शेतकऱ्यांना भूलवतात आणि त्यांच्या दुकानातून साहित्य घेण्यास उद्युक्त करतात. शेतकरी बिचारा त्यांच्या गोडगोड गप्पांना भुलतो आणि त्याच दुकानातून साहित्य खरेदी करतो कुणास ठाऊक ते दर्जेदार आहे की नाही. दुकानदाराने सांगितली एवढी ताकद या खत बियाणे मध्ये आहे का नाही. ठराविक दुकानातील साहित्य योग्यप्रतीचे असते. परंतु बऱ्याच दुकानातील साहित्य खालच्या प्रतीचे असते. त्यामुळे या भुलथापांच्या, जाहिरातबाजीला भुलून शेतकऱ्यांचा पूर्ण हंगाम वाया जातो. अशावेळी तो इतरांना दोष न देता आपल्या नशिबाला दोष देत बसतो. शेतकऱ्याचा दुकानावरती एवढा विश्वास असतो की त्यावर आय. एस. आय. चा मार्क नसला तरी तो खरेदी करतो आणि तोट्यात जातो असे कितीतरी शेतकरी तोट्यात गेले आहेत. गोड बोलून गळा कापण्याचे काम हे दुकानदार या शेतकऱ्यांचे करतात. या संदर्भात प्र. बा. भोसले म्हणतात, ''या दुकानदारांना बनावट गोष्टी केवळ जास्त मिळणाऱ्या कमिशनच्या लोभाने विक्रीसाठी ठेवाव्याशा वाटतात याची त्यांना शरम वाटली पाहिजे. त्यांच्यावरच्या विश्वासाने येणाऱ्या शेतकऱ्यांची फसवणूक करताना त्यांना कसलाही संकोच वाटत नाही याचे आश्चर्य वाटते? ही शुद्ध हरामखोरी आहे! शेतकऱ्यांनी अशा हरामखोरांना उघडे पाडून त्यांच्या दुकानावर कायमचा बहिष्कार घातला पाहिजे. शेतकऱ्यांचे गिऱ्हाईक कमी झाल्याने आर्थिक नुकसान झाल्यावरच त्यांचे विकृत लोभाने बिघडलेले डोळे उघडतील. अशांचा निषेध करावा तेवढाच थोडा.''[१९] त्या दुकानदाराना सांगितले की तुमचे बियाणे, खत, चांगल्याप्रतीचे निघाले नाही तर ते आपल्यावरती येऊ न देता कंपनीला कळवतो, नुकसान भरपाई मिळवून देतो असे दुसरेच काही तरी कारण सांगून शेतकऱ्यांचे लक्ष तिकडे वळवून आपण नाममात्र रहतात. हे व्यापारी शेतकऱ्यांकडून मालाच्या दुप्पट किंमत घेतात. शेतकरी बिचारा जाहिरातीच्या दुकानदारांच्या गोड फसव्या माहितीला फसतो आणि अशा भूमिकेतून मालाची खरेदी करतो.

शेतीतून येणाऱ्या पिकाचे उत्पादन हंगामानुसार येत असते म्हणून शेतकरी आपल्या प्रपंचाला

चार पैशाचा हातभार लावण्यासाठी भाजीपाला लावतो भाजीपाला दिड-दोन महिन्यात विक्रीला येतो. त्यामुळे कमी दिवसात चार पैसे मिळविण्यासाठी शेतकरी भाजीपाला लावतो. शेतकरी भरपूर कष्ट करून भाजीपाल्याचे उत्पादन, पीक भरघोस आणतो. परंतु त्याला दर देणे न देणे हे सर्वस्वी व्यापाऱ्यांच्या हातात असते. त्यामुळे उत्पादन काढणेच फक्त त्याच्या हातात असते. कधी कधी तर त्यातही त्याचे गणित फसते. या संदर्भात अर्थतज्ज्ञ श्री. बोकरे असे म्हणतात, ''व्यापारी जो भाव शेतकऱ्याच्या मालाला देतो तो भाव त्याला किफायतशीर नसतो. त्यातून तो आपल्या खर्चाची तोंड मिळवणी करू शकत नाही. कर्ज घ्यायचं आणि फेडायचं एवढ्यातच शेतकऱ्यांच आयुष्य जातं त्यामुळे कर्ज पुरवठा करणाऱ्या बँकानी व्याजदर कमी करावे, यासाठी लढा देणे बंद करून शेतीमालाला वाजवी भाव मिळण्यासाठी लढा देणे गरजेचे आहे.''[२०]

व्यापाऱ्यांच्या वरतीच शेतकऱ्यांच्या मालाचा दर ठरत असतो. कधी-कधीतर कोणत्या शेतकऱ्याचे नशिब उजाळेल हे सांगता येत नाही. कारण काहीवेळा उत्तम प्रतीच्या भाजीपाल्याचा दर ढासळतो. तर कधी निकृष्ट प्रतीच्या भाजीपाल्याला एक नंबर दर लागतो. जणू काही लॉटरीचे तिकीट काढल्यासारखा शेतकरी बाजारादिवशी नशिब अजमावत असतो. त्यामुळे भाजीपाल्याचा मळा खिसा वाजे खुळखुळा अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. भाजीपाल्याचा रोजच्या रोज येणारा ताजा पैसा लोकांना दिसतो. पण त्या पाठीमागचे कष्ट मात्र कोणालाच दिसत नाहीत. उलट शेतकऱ्यांनाच म्हणतात, ''काय राव रोज माळव्याचा ताजा पैसा येतोय तरी इवळताय होय?'' आता या वाक्याला शेतकऱ्यांना काय उत्तर द्यायचे हेच कळत नाही. मोठे शेतकरी माल भरपूर असल्यामुळे एकदम व्यापाऱ्याला विकतात. छोटे शेतकरी बाजारात बसून विकतात. भाजीपाला न्यायला बाजारात आल्यावर दर कमी करण्यासाठी एक झालं की एक हुज्जत घालत असतात. जणू काही भाजी विनाखर्चात, विना कष्टात उगवते. त्यानाच एकदा भाजीपाला पिकवायला आणले पाहिजे. म्हणजे भाजी कितीला मागायची याची अक्कल येईल. शेतकरी त्याची बायका-पोरं भर उन्हात राबत असतात. शिवाय तो वेळेवर तोडला तर बरं नाहीतर पुन्हा तो विकण्याच्या पुढे गेला म्हणजे जून झाला दर कमी लागतो. हेच गिऱ्हाईक पुन्हा भाजी जूनच आहे. मोठीच आहे अशी मापे काढतात काही वेळा तर चार पैसे येतील म्हणून जीवापाड कष्ट करून

भाजीपाला पिकवायचा बाजारात न्यायचा बाजारात नेल्यावर त्याला सगळ्यात कमी दर लागतो. एस. टी. भाडेही निघणे मुश्किल होते. परंतु तोच भाजीपाला पुन्हा बाजारात घ्यायला गेले तर किती महागलेला असतो. या सर्व चक्राचा विचार करता या शेतकऱ्यांच्या दुधावरची मलई खाणारे दुसरे तिसरे कोणी नसून व्यापारीच आहेत. कारण शेतकऱ्यांच्या आर्थिक नुकसानीस तेच जबाबदार आहेत. कारण त्यांनी कधीच शेतकऱ्याला स्वतःच्या मालाचा दर ठरवू दिला नाही का त्याला दर मिळू दिला नाही. हे व्यापारी शेतकऱ्यांकडून माल कमी किंमतीने विकत घेतात. पुन्हा तो माल छोट्या-छोट्या व्यापाऱ्यांना विकतात. हे छोटे व्यापारी पुन्हा त्यात चार पैसे फायदा काढून गिऱ्हाईकांना विकतात. म्हणजे व्यापारी काहीही कष्ट न करता फक्त खरेदी केला म्हणून चार पैसे फायदा काढतात आणि ज्या शेतकऱ्यांनी ऊन-पाऊसाचा विचार न करता भाजीपाला पिकवला त्याच्या पदरात काय फक्त तोटाच.

शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी सरकार अनेक योजना आखत आहे. शेतीवरील कर्जाचे व्याज माफ करत आहेत. अल्पव्याजदर लावत आहेत. इत्यादी अनेक योजना आखत आहेत. सरकारने हे सर्व करण्यापेक्षा शेतकऱ्यांच्या मालाला योग्य भाव द्यावा. म्हणजे शेतकरी आर्थिकदृष्ट्या सबल होईल. त्याला इतर कोणत्याही मदतीची गरज लागणार नाही.

**४) संकरित बियाणे :-**

संकरित बियाण्यामुळे शेतकरी बियाण्यासाठी परावलंबी झाला आहे. दरवर्षी त्यांना बियाण्याची खरेदी करावी लागते आणि जेव्हा बियाणे खरेदी करण्यासाठी कृषि सेवा केंद्रावर शेतकरी जातो. तेव्हा त्याची फसवणूक होते. पूर्वीच्या काळी बियाणे विकत घेण्याची आवश्यकता नव्हती शेतकरी या वर्षीचे धान्य बाजूला काढून ठेवत. वर्षभर त्या बियाण्याला हात लावत नसत. एखाद्याकडे पेरणीच्या वेळी बियाणे नसेल तर ते वाढीने दुसऱ्या शेतकऱ्याला घातले जात असे. परंतु ते पैशाने विकले जात नसे. बियाणे विकणे प्रशस्त मानले जात नसे. त्यामुळे उत्तम प्रतीचे, नैसर्गिक पद्धतीने साठवण केलेले बियाणे अस्तित्वात होते. आधुनिक तंत्रज्ञानामुळे ही परिस्थिती बदलली आहे. अतिरिक्त उत्पादन काढण्याच्या हव्यासामुळे, जाहिरात बाजीमुळे


BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

शेतकरी संकरित बियाण्यांच्या नादी लागून एका मोठ्या वावटळात सापडला जिथून पुन्हा माघारी येणे त्याला अशक्य झाले. सोन्याच्या किंमतीने विकत आणलेले बियाणे जर खोटे निघाले उगवलेच नाही तर त्या शेतकऱ्यांनी काय करायचे? विक्रेत्यांनी शेतकऱ्यांना खोटी बियाणे दिली. त्यांना फसवले या गोष्टी गेल्या दहा–पंधरा वर्षापासून ऐकायला मिळत आहेत. त्या पूर्वी घडण्याची शक्यताच नव्हती हे सर्व बंद करून पुन्हा उत्तम प्रतीचे बियाणे तयार करण्यासाठी श्री. वसंत फुटाणे म्हणतात, ''प्रत्येक गावाची बीज बँक असावीच. याकरिता बियाणाची शुद्धता टिकवण्यासाठी संपूर्ण गावाने एकत्र बसून पिकांचा विचार करावा लागेल. हे काम सोपे नाही तसेच अशक्यही नाही.''[२१] असे कले तरच पुन्हा देशी बियाणे अस्तित्वात येऊन सकस धान्य खायला मिळेल. सुरूवातीला या गोष्टीचा त्रास होईल परंतु याला दुसरा पर्याय नाही.

आधुनिक तंत्रज्ञानाबरोबर बियाण्यातही बदल झाला आहे. पूर्वीचे देशी बियाणे जावून आता संकरित बियाणे आले आहे. वर्षाचे देशी बियाणे हे खायलाही सकस. संकरित बियापासून तीन–चार महिन्यातच उत्पादन निघते, त्याच बरोबर उत्पादन भरपूर होते. संकरित बियाण्याचे वैशिष्ट्य् हणजे कमी वेळेत जास्तीत जास्त उत्पादन मिळणे हे होय. या संदर्भात आनंद यादव म्हणतात, ''सुधारलेल्या बियाणांमुळे अन्नधान्यांचे प्रमाण वाढले हे कुणीही नाकारू शकत नाही. कारण ही बियाणे पूर्वीच्या त्याच प्रकारच्या धान्यापेक्षा लौकर परिपक्व होतात. उदाहरणार्थ जोंधळा हे पीक पेरल्यानंतर पूर्वी पाच–साडेपाच महिन्यांची परिपक्व होत असे. पण नव्या प्रकारची हायब्रीड ज्वारी तीन महिन्यातच परिपक्व होते. त्यामुळे तिला पूर्वीच्या जोंधळ्याच्या तुलनेत पाणी कमी लागते. त्यामुळे पाणी वाचते. खुरपणी, भांगलणी कमी कराव्या लागतात. त्यामुळे मानव कष्ट आणि खर्च कमी होतो. तीन महिन्यांनी जमीन मोकळी झाल्याने तिच्यात लगेच गहू, हरभऱ्यासारखे लौकर येणारे दुसरे पीकही घेता येते. शिवाय जुन्या जोंधळ्याच्या कणसापेक्षा नव्या हायब्रीड ज्वारीचे कणीस मोठे असल्याने धान्याचे प्रमाणही वाढते. हा मोठा फायदा झाला. पण पूर्वी जोंधळ्याच्या भाकरीला एक गुळचट चव होती. या जोंधळ्याचा दुधाळ हुरडा खाताना तोंडाला पाणी सुटत असे. लहान मुले नुसतीच ताजी भाकरी बिस्किटासारखी कोरडी खात खात खेळत असत. नव्या ज्वारीची भाकरी गोड नाही. ती बेचव असते. कोरडी खाल्ली तर चव लागत नाही. गिळताना घशाला कोरड

पडते. जुना जोंधळा आणि नवी ज्वारी या दोहोंचा कडबा किंवा बाटूक जनावरांसमोर जरी टाकले तरी जनावरांना जुन्या जोंधळ्याचा कडबा किंवा बाटूक अधिक रूचकर लागते. जनावरे पहिल्यांदा तेच खातात. नाइलाज झाला तर नव्या ज्वारीचा कडबा खातात. आता जुना जोंधळा नामशेष झाला. तो नुसता पाहायलाही मिळत नाही.''[२२]

संकरित प्रकाराना कसलीच चव नाही जो सकसपणा होता तो राहिला नाही. दोन्हीमध्ये जमीन–आस्मानाचे अंतर आहे. संकरित बियाणे बेचव झाले आहे. फक्त जगायचे म्हणून खायचे एवढाच अर्थ त्या पाठीमागे राहिला आहे. पूर्वीचे खत, धान्य, फळ, भाजीपाला यात खूप बदल झाला आहे. म्हणून दिवाकर चौधरी म्हणतात, ''कोणचीबी पहिली अन् आताची चव पहा. पहिली जिवारी पहा आताची हायब्रीड पहा. पहिले टमाटे पहा, आताचे टमाटे पहा, टपोरे राहता पण बेचव. फळ, धान्य सगळी चवच बदली गेली. एवढंच काय, गावठी मुर्गा अन् आताचा संकरित मुर्गा कसा बेचव नुसता स्पंजासारखा कुच्चा लागतो.''[२३]

लेखकांनी देशी बियाणे व संकरित बियाणे याचे महत्त्व अतिशय मार्मिक शद्बात स्पष्ट केले आहे. पूर्वीचे देशी बियाणे पेरायचे झाले तर बियाण्याला कमी पोती धान्य होते. परंतु ते सकस चवदार असते याउलट संकरित बियाणे जरी सकस, चवदार नसले तरी त्याचे उत्पादन भरपूर पोती निघते. आताची लोकसंख्या एव्हढी वाढली आहे की, पूर्वीच्या धान्याचा काहीच उपयोग नाही. एवढेसे धान्य कोणाला म्हणून पूरवायचे त्यापेक्षा आताचे संकरित बियाणेच बरे. कारण एवढ्या लोकसंख्येला धान्य पुरविण्यासाठी संकरित बियाण्याशिवाय पर्याय नाही. या संदर्भात श्री. वसंत फुटाणे म्हणतात, ''आज ग्राहकही गावरान वाण पसंत करतात, त्याची चव त्याला तृप्ती देते. मात्र या कंपन्या ते बियाणेच नष्ट करू पहात आहेत. बी संपलं तर पुढचं सगळं संपून जाईल. म्हणून या कंपन्यांना प्राणपणाने विरोध करून आपलं बियाणं जपणं हे शहरी ग्रामीण सगळ्यांचच आज कर्तव्य आहे.''[२४]

संकरित बियाण्यामुळे तसेच खते किटकनाशके यांच्या वापरामुळे जमिनीचा पोत ढासळला आहे. जमिनीचा पोत कमी झाल्यामुळे जमीन नापीक होऊ लागली आहे. त्यामुळे उत्पादन कमी निघते. वेळेवरच लक्ष देऊन त्यात सुधारणा केली तर ठिक नाहीतर नंतर जमिनीत कसलेच पीक

येत नाही. त्यासाठी शेतकऱ्यांनी परंपरागत पद्धतीने शेती केली पाहिजे. संकरित पीकांमध्ये काहीच ताकद राहिली नाही. कोणतेही पीक हे रोगाशिवाय नाही. पिक मोठ होतय ना होतय तोच त्यांच्यावर अनेक रोग येतात. कोणतेही पीक असो त्याच्यावर रोग हा आहेच म्हणून दिवाकर चौधरी म्हणतात, ''पीक कसं रानवट पाहिजे कशाचाच परिणाम होयाले नको त्याच्यावऱ्हे पानी लेट झालं कारे हा आहे ताठच्या ताठ.''[२५] लेखकांनी सांगितल्याप्रमाणे पिकामध्ये एवढी ताकद पाहिजे की ते कोणत्याही रोगाचा प्रतिकार करू शकेल. या नाजूक पिकांच काम म्हणजे दिखने मे अच्छा चलनेमे ढब्बू असे आहे. म्हणूनच देशी बियाण्यासाठी तुकाराम महाराजांच्या वचनाप्रमाणे ''शुद्ध बिजापोटी फळे रसाळ गोमटी'' याचा प्रत्यय येतो.

**५) जमिनीचा पोत :-**

जमिनीचा पोत सुधारणे ही शेती व्यवसायातील महत्त्वाची क्रिया आहे. दिवसेंदिवस जमीनीची प्रत हलकी होऊ लागली आहे. ती सुधारणे काळाची गरज आहे. जमीनीचा पोत जर सुधारला नाही तर अवघड परिस्थिती निर्माण होईल. धान्य उत्पादनात घट होऊन सर्वत्र अन्नाची टंचाई निर्माण होईल. त्यासाठी जमीनीची प्रत न खालावता दिवसेंदिवस ती अधिक सक्षमतेने पिकली पाहिजे.

पूर्वीच्या काळी शेतीत फक्त शेणखतच घातले जात असे. शेतीही पारंपारिक पद्धतीने केली जाई जेणेकरून जमिनीचा पोत खालवणार नाही. स्वातंत्र्यप्राप्ती नंतर आधुनिकीकरणामुळे नवनविन रासायनिक खते किटकनाशके यांच्या वापरामुळे जमीन निकृष्ट प्रतीची होऊ लागली आहे. त्यामुळे जमीन नापीक होऊन उत्पादन कमी निघू लागले आहे. ५० वर्षापासून रासायनिक शेती लोकांच्या अंगवळणी पडली आहे. यातून लगेच बाहेर येणे शक्य नाही. परंतु हळूहळू सेंद्रीय पद्धतीची शेती करून, जमीनीचा पोत सुधारला पाहिजे. नाहीतर कालांतराने पिकाऊ जमीन हळूहळू कमी होऊन शेतीचा ऱ्हास होईल. यासंदर्भात मोहन शंकर देशपांडे म्हणतात, ''कृषितज्ज्ञ पराशर मुनीनी सांगितले आहे की, व्यवस्थित निगा राखलेली शेती सोने निर्माण करते, व ज्याची देखरेख व्यवस्थित नाही अशी शेती दैन्य देते.''[२६]

जमिनीचा पोत चांगला राहिला तर उत्पादन चांगले निघते. जमीनीच्या प्रतवारीवरच

पिकाचे उत्पन्न अवलंबून असते. जमीनीचा पोत काही एकदम सुधारतो असे नाही तर त्यासाठी वर्षानुवर्ष काळजी घ्यावी लागते. जमीनीचा पोत सुधारण्यासाठी शेणखतासहित पीक फेऱ्याला खूप महत्त्व असते; म्हणजे अमुक एक पीक झाले की, अमुक एक पेरावे; जमिनीचा पोत सुधारण्याची ती एक मात्रा आहे. जास्तीत जास्त रासायनिक खते कीटकनाशके यांच्यामुळे जमीनी नापीक झाल्या आहेत. बागायत शेतीला वारंवार पाणी दिल्यामुळे तसेच पुन्हा पुन्हा त्यात तेच पीक घेतल्यामुळे जमीनीचा कस कमी झाला आहे. तसेच रासायनिक खते, फवारे यामुळे जमिनीतील गांडूळ, पाणी, जमीनीतील कृमी जमीन भुसभूशीत करतात. आणि खत म्हणून पण त्यांचा उपयोग होतो. हे शेती उपयोगी कृमी रासायनिक खतांच्या वापरामुळे कमी होऊ लागले आहेत.

शास्त्रोक्त आणि नैसर्गिक यांच मिश्रण ठेवायला पाहिजे होते. परंतु शास्त्रोक्तच्या नावाखाली जमीनी वरती अनेक प्रयोग करण्यात आले. रासायनिक घटकांचा वापर झाला. त्यामुळे जमीनीवरती अत्याचार झाले आहेत. वारंवार पीक घेतल्यामुळे जमीनीला विश्रांती नाही. आधुनिक शेतीमधील पीके तर तीन–चार महिन्याची असल्यामुळे वर्षातून दोन–तीन पीके घेतली जातात. त्यामुळे जमीन नापीक झाली आहे. या सर्व गोष्टी शेतकऱ्यांना समजतात परंतु यावर उपाय काय करायचा हे लक्षात येत नाही. काहीही करून जमीनीचा पोत सुधारला पाहिजे. नाहीतर काही वर्षांनी जमीन पिकणारच नाही. पूर्णपणे नापीक होईल. जमीन सुधारण्यासाठी सरकारने काही तरी कार्यवाही केली पाहिजे. आधुनिक शेतीमध्ये रासायनिक खते, किटकनाशके, संकरित बियाणे यांचा वापर न करता शेती नैसर्गिक पद्धतीने करण्याकडे भर दिला पाहिजे. या संदर्भात मोहन शंकर देशपांडे म्हणतात, ''रासायनिक खतांचा वापर होण्यापूर्वी येथे सुबत्ता होती, स्थैर्य होते, त्याचीच पुढची पायरी म्हणून निष्क्रियताही आली होती. परकीय आक्रमणे ही आपल्या नैसर्गिक संपत्तीमुळे होत होती. या आक्रमणातून आपण पुरेसे सावरलो नाही. तोच मानसिक गुलामगिरीमध्ये चांगलेच जखडले गेलो. रासायनिक खते–औषधांच्या भुलभुलैय्याला बळी पडला. ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही.''[२७]

सरकार अवजड उद्योगाच्या भल्याकडे पाहते तसे जमिनीच्या सुधारणेसाठी काहीतरी केले पाहिजे. तालुका पातळीवर माती परिक्षण केंद्र केले पाहिजे. शेतकऱ्यांनी माती परीक्षण केले नाही

तर सरकारने जागोजागी केंद्र उभारून स्वतः माती परीक्षण केले पाहिजे. जमीनीचा पोत सुधारण्यासाठी ज्या गोष्टी आवश्यक आहेत त्या जलद गतीने केल्या पाहिजेत पूर्वी पीके ही वर्षाची दिडवर्षाची होती आता ती दोन तीन महिन्याची झाली आहेत. त्यामुळे त्यात कोणताच कस राहिला नाही. जगायचे म्हणून खायचे अशी अवस्था या धान्याची झाली आहे. या संदर्भात दिवाकर चौधरी म्हणतात, ''सुधारित टेक्निक पाहिजे पण त्याच्यान ओरिजिनॅलिटीवर जादा परिणाम होयाले नको हे मले तुम्हाले सागनं आहे. त्या दृष्टीनं सगळे प्रयत्न केले पाहिजे.''[२८] तसेच मोहन शंकर देशपांडे जमिनीचा पोत पूर्वी आणि आता कसा आहे या विषयी म्हणतात, ''जमीन पिकासाठी तीन वर्षातून एकदाच वापरली जात होती. नदीकाठ तर गवतासाठी राखीव. जमिनीची धूप थांबविण्यासाठी व पाणी धरून ठेवण्याची क्षमता वाढविणाऱ्या शेती पद्धतीची जाणीवपूर्वक जपणूक केलेली दिसून येते. याउलट आताची शेती पद्धती एकाच जमिनीतून तीन तीनदा पिके काढून घेणारी, नदीकाठ ऊसाने वेढलेले, जमीन जाळून व्राढणाऱ्या खताने भरलेला. पर्यायाने जमिनीची धूप करून नदी–नाले गाळाने भरून कोट्यावधी रूपये खर्च करून बांधलेल्या धरणाची क्षमता कमी करणारी प्रचलित शेती पद्धत आहे.''[२९] तसेच सुधारित तंत्राबरोबर पीकाची, जमीनीची प्रत, टिकून राहिली पाहिजे त्यासाठी जमीनीची ढासळलेली प्रत पुन्हा पूर्ववत आणली पाहिजे. जमीनीचा पोत सुधारायचा असेल तर प्रत्येक शेतकऱ्याने शेणखत टाकले पाहिजे वारंवार पीके न घेता जमीनीला थोडी विश्रांती दिली पाहिजे. रासायनिक खते, किटकनाशके यांचा वापर करू नये. गांडूळ खतांचा वापर करावा जेवढे शक्य होईल तेवढे नैसर्गिक शेती करण्याचा प्रयत्न करावा.

### ६) शेतकरी संघटना :-

शेतकऱ्यांच्या जीवनामध्ये अनेक अडचणी असतात या अडचणी त्यांच्या एकट्यापुरत्या नसतात तर सर्व शेतकऱ्यांना या अडचणी भेडसावत असतात. या अडचणीतून मार्ग एकटा शेतकरी काढू शकत नाही. त्यासाठी सर्व शेतकऱ्यांनी एकत्र येऊन या समस्यांना एकजुटीने सामोरे गेले पाहिजे. कितीतरी शेतकरी अशा अनेक कटकटींना सामोरे जात जीवन जगत आहेत

आणि इतके होऊनही शेतकऱ्यांवर अन्याय होतोय असं म्हणण्याची कुणाकडे ताकद नाही. म्हणून या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी दिवाकर चौधरी म्हणतात, ''किसनाईहो काहीतरी करारे युनिटी करारे युनिटी करा गधडीच्याईहो''[३०] याच संदर्भात श्रीकांत करे म्हणतात, ''निसर्गाचा एक नियम आहे, जो पूर्वीपासून चालत आला आहे, तो म्हणजे या दुनियेत मागून काहीच मिळत नसतं जे काही हवं असेल ते मिळवावं लागतं'' पूर्वीच्या काळी हिंसक क्रांतीने तर स्वातंत्र्य काळात व नंतर अहिंसक मार्गाने मिळवावं लागतं.[३१]

तसेच प्र. बा. भोसले म्हणतात, ''जे आपल्या हक्कांविषयी जागरूक नसतात, संघटित नसतात त्यांच्या नशिबी हेच असते. म्हणून आम्ही पुन्हाः पुन्हा हेच सांगता की शेतकऱ्यांनो संघटित व्हा.''[३२] शेतकरी बंधूनीही कोणालाही न घाबरता कोणाचाही विचार न करता आपले हक्क मिळविण्यासाठी शांततापूर्ण पद्धतीने सर्वांनी संघटित होऊन शेतकरी संघटना उभारून आपल्या हक्काला न्याय मिळविला पाहिजे तरच कोणताही अनमोल जीव नको त्या कारणासाठी मातीमोल न होता मोठ्या धैर्याने येणाऱ्या संकटाना सामोरा जाईल. आपल्या देशात शेतकरी संघटना नसल्यामुळे शेतकरी मागे राहिला आहे. या संदर्भात चवरे आर. व्ही. म्हणतात, ''शेतकरी संघटीत नसल्यामुळे प्रत्येक ठिकाणी त्यांची आर्थिक पिळवणूक होत आहे. एकीकडे दरवाढीचा मार झेलणारा शेतकरी दुसऱ्या बाजूने अनिश्चित बाजारभावाप्रमाणे शेतीमाल विकत आहेत. बँकांनी कर्ज देण्यास उदासीनता दाखविल्यामुळेच शेतकरी नाईलाजाने खाजगी सावकारांकडून न परवडणाऱ्या व्याजाने कर्ज घेत आहेत. धरणग्रस्त पुनर्वसनाचा कायदा नावापुरताच असून या कायद्याने धरणग्रस्त शेतकऱ्यांचे अपेक्षित पुनर्वसन झालेले नाही ही वस्तुस्थिती आहे.''[३३] कोणत्याही शेतकरी समस्येला अथवा, शेतकरी हक्काला एकजुटीने सर्व शेतकऱ्यांनी उभे राहिले पाहिजे तरच कोणत्याही हक्कापासून शेतकरी वंचित राहणार नाही. शेतकरी म्हणेल तेच होईल. अन्याय व शोषणाविरूद्ध लढण्यासाठी मजबूत संघटना हवी त्याशिवाय शेतकऱ्यांच्या अन्यायाला वाचा फुटणार नाही. महाराष्ट्रात अशा शेतकरी संघटना निर्माण झाल्या पाहिजेत आणि त्यांनी अन्यायाविरूद्ध संघर्ष केला पाहिजे.

अलिकडच्या काळात शेतकरी संघटना निघाल्या. या संघटनेमध्ये अनेक शेतकरी सामील होतात. त्यांचे नेतृत्व काही मोजकी मंडळी करतात. त्यातील काही शेतकरीच असतात. हे लोक पुढारी, संघटनेचे नेते म्हणून दिल्लीपासून गल्ली पर्यंत चमकतात या सर्वांचे आर्थिक व राजकीय हित साधले जाते पण शेतकरी मात्र कर्जात बुडतात. या संदर्भात वासुदेव मुलाठे म्हणतात, ''कारण अन्याय करणारा हाच मुळी शेतकऱ्यांच्या घरातला आहे. घरातलाच माणूस जर अन्याय करीत असेल तर दाद तरी कुणापुढे मागायची? आणि विरोध तरी कुणाला करायचा?''[३४] असे न होता खरचं ज्याना शेतकऱ्यांच्या विषयी आत्मीयता, दुःख, कळवळा आहे त्या लोकांनी, शेतकऱ्यांच्या मुलांनी चांगल्या नेतृत्वाची वाट बघत बसण्यापेक्षा शेतकरी कुटुंबातील कितीतरी मुले शिकलेली आहेत. त्यांनी आपल्या शेतकरी समाजाचे दुःख समजून घेतले पाहिजे. आता कुणीतरी येईल आणि आपला उद्धार करील या आशेवर जगण्यापेक्षा आता सर्वांनी स्वइच्छेने संघटित होऊन प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. संघटनेचा कोणी नेता न ठरविता प्रत्येकाने स्वतःला संघटेनचा नेता समजून कार्य केले पाहिजे. एखाद्या ठिकाणी शेतकऱ्यांवरती अन्याय झाल्यास तिथल्याच शेतकऱ्यांनी आवाज उठवला पाहिजे. संघटनेचे नेते हे एखाद्या आंदोलनाच्यावेळी त्यांच्या फायद्याचे काही निघाले अथवा वरिष्ठ राजकिय नेत्यांकडून दबाव आला तर लगेच आंदोलन मागे घेतात. शेतकरी बांधवाना काही तरी कारण सांगून वातावरण शांत करतात. भोळ्या बांधवांचा विश्वास या नेत्यांवरती असतो त्यामुळे ते गप्प बसतात. असे होऊ नये म्हणून प्रत्येक शेतकऱ्यांनी स्वतः कोणत्याही गोष्टीला न घाबरता, 'कर नाही त्याला डर कशाला' या भुमिकेतून पुढे आले पाहिजे.

फक्त आपल्या देशातल्या नव्हे तर जगातल्या सगळ्या शेतकऱ्यांची संघटना झाली पाहिजे. प्रत्येक शेतकऱ्याने दुसऱ्या शेतकऱ्यांचे भले चिंतले पाहिजे, नाहीतर माझे टोमॅटो जास्त दराने विकावे आणि दुसऱ्या शेतकऱ्यांची भेंडी कमी दरात मिळाली पाहिजे. आपल्या मालाचा भाव आपल्यालाच ठरवता आला पाहिजे. पंजाबमधला गहू कमी दरात विकला तर जगातल्या प्रत्येक शेतकऱ्यांनी आवाज उठवला पाहिजे. पंजाबला एवढा विश्वास पाहिजे की कोठेही गेले तरी आपला शेतकरी बांधव ही घटना सहन करणार नाही. सर्व जगाला शेतकरी एकजुटीचे महत्त्व कळले पाहिजे. शेतकऱ्यांनी जर संघटना केली तर देशातच काय पण जगात अजिंक्य

होतील. यासंदर्भात दिवाकर चौधरी म्हणतात, ''आम्ही आमच्या शेतात गैन्हं राबू आणि आमची युनिटी कायम ठेवू. मंग कोणता भडवा आम्हाले चॅलेंज देतो ते पाहू. जयहिंद.''[३४]

प्रत्येक शेतकऱ्याला वाटत असते की आपल्यापेक्षा दुसरा शेतकरी मजेत आहे. आपणही तेच पीक घ्यावे म्हणजे आपणही मजेत राहू पण काय, 'सब घोडे बारा टक्के' अशी सगळ्यांचीच स्थिती आहे. शेतीत परवडत नाही, तर हा व्यवसाय सोडून दुसरा व्यवसाय करू असे शेतकरी म्हणत नाहीत. कितीही कष्ट करावे लागले आणि तोटा झाला तरी हा व्यवसाय ते सोडत नाहीत. यावरून त्यांचे काळ्या आईवरती किती प्रेम आहे हे जाणवते. शेती करणे आजकाल परवडत नाही. खते, बियाणे, मजुर सगळ्या गोष्टी महागल्या आहेत. महागाई बरोबरीने नवनवीन रोगांचा प्रादुर्भाव वाढत आहे. त्याच्यामुळे इकडं आड तिकडे विहिर अशी अवस्था झाली आहे. शेतकरी संघटना नसल्यामुळे शेतकरी मागे पडला आहे. त्याच्या कोणत्याच मालाला भाव नाही. तो स्वतः आपल्या मालाचा भाव ठरवू शकत नाही. त्याच्या जीवावर व्यापारी चैन करू लागले आहेत. मजुरांनीही  शेतकऱ्यांना मेटाकुटीला आणले आहे. या सर्व गोष्टींना तोंड देण्यासाठी संघटनेशिवाय पर्याय नाही.

संघटना निर्माण करण्याची गरज का लागली पूर्वीच्या काळी शेतकरी संघटना होत्या का? आत्ताच संघटनेची आवश्यकता का? असा विचार केल्यास असे लक्षात येते. शेतकरी पूर्वीसारख कष्ट करीत नाहीत. ऐतखाऊ प्रवृत्ती त्यांच्याकडे वाढली आहे. जे काम करायचे ते मजुरांकडूनच त्यांची उमेद ढासळली आहे. त्यामुळे अनेक समस्यांनी डोकेवर काढले आहे. त्यांना आटोक्यात आणण्यासाठी संघटनेशिवाय पर्याय नाही. जोपर्यंत शेतकरी वर्गासाठी स्वर्गीय भाऊसाहेब, पंजाबराव देशमुख यांच्या सारखे प्रामाणिक व कर्तव्यदक्ष नेते, महात्मा फुल्यांसारखे शेतकऱ्यांचे कैवारी, पुन्हा शेतकरी संघटनेला दूरदृष्टी असलेले नेते लाभत नाहीत. तोपर्यंत शेतकरी कर्ज मुक्त व शोषणमुक्त होणार नाही. म्हणून शेतकरी बांधवांनी जागे होऊन जेवढा शक्य होईल तेवढा विरोध करून आपल्या भारत भूमीला समृद्ध केले पाहिजे.



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

### ७) मालक आणि नोकर यांच्यामधील संबंध :-

मालक आणि मजुर या दोघांचेही वागणे एकमेकांना पटत नसते; परंतु दोघांनाही एकमेकांशिवाय पर्याय नसतो म्हणून दोघेही आपापसात प्रेमाने वागतात. एकमेकांच्या हातात हात मिळवतात. जणू काही दोघेही एकमेकांच्या विचारांना सहमत आहेत. परंतु प्रत्यक्ष स्थिती वेगळी असते. या संदर्भात दिवाकर चौधरी म्हणतात, 'तो जे खोट बोलत होता. ते खरं आहे, असं तो दाखवत होता, तर मी जे खोटं बोलत होता ते खरं आहे असं तो दाखवत होता.' कारण त्यालेबी अन मलेबी संघर्ष नको होता. अर्थात संघर्ष झाला असता त मीच हरला असता कारण तो दोर झटकीसन चाल्ला जाता. अन टाईम पडला तं गरीबाईले कस छळताच वर्णन बी त्यानं केलं असतं.'[३६]

विकास, नामा यासारखे मजुर लेखकांच्या वाड्यावर कामाला होते. एक-एक जण अशा पद्धतीने काम करे जणू काही त्यांच्या अंगातून वारे गेल्या सारखे. समजा एखादे काम तो करत असेल; ते काम तो व्यवस्थित करत नाही, म्हणून आपण पुढे होऊन ते करावे म्हटले तर, तसे करता येत नाही. कारण तो म्हणेल हे चाल्लो मी बसा एकटेच करत. मग काय करायचे त्यापेक्षा राग मनातल्या मनात गिळून गप्प बघत रहायचे काम कसे का करेनात होण्याशी मतलब लवकर किंवा हळू.

रोज सरासरी किती काम झाले पाहिजे याचा अंदाज शेतकऱ्यांना असतो. हसत खेळत केले तरी तेवढे काम दिवसभरात झाले पाहिजे. परंतु काही जण तेवढेही करत नाहीत उलट त्यापेक्षा पण कमी करतात. तर काही जण पटपट उरकून दिवसभर निवांत बसतात. संध्याकाळी घरी आल्यावर मालक आणि मजुर यांच्यात दिवसभराच्या कामाविषयी चर्चा होते. काय काम केले कसे केले. ही चर्चा सुद्धा ऐकण्यासारखी असते. कारण दोघेजण एकमेकांना पटतील अशीच उत्तरे देत असतात. काम कमी झाले का जास्त पण तेच बरोबर मालकांना पटवून द्यायचे. अशी कला या मजुरांकडे असते. मालकांना या सर्व गोष्टी माहित असूनही तो फक्त त्यांचे ऐकून घेत असतो. या संदर्भात दिवाकर चौधरी म्हणतात, ''खरा किसान अशी बैठक घेतोच या धंद्यातली ती एक गरज आहे. ते एक सायकॉलॉजीबी आहे. त्याच्यानं मालकाचं लक्ष बी रहातं अन् सालदारावऱ्हे वचक बी राहतो. अर्थात अशा बैठकी आता लयच कमी हुई चालल्या.''[३७]

मजुरांवरती वचक, दरारा ठेवणे हा जमाना आता राहिला नाही. उलट मजुरच शेतकऱ्यांना धाक दाखवू लागले आहेत. पटत असेल तर रहातो नाहीतर चाललो मी. त्याला काय हे नाही ते काम. त्यामुळे मालकाला एखाद्या गोष्टीचा राग येऊनही ते मजुरांना काही बोलत नाहीत. मालक नोकरांना काम सांगताना सांगतात एखादा दिवस जास्त जाऊ द्या; पण काम व्यवस्थित झाले पाहिजे. शेतकरी मजुरांशी प्रेमाने वागून नोकर व मालक यांच्यातील अंतर कमी करू पहातो, परंतु कितीही चांगले वागण्याचा प्रयत्न केला तरी शेतकरी व मजुर यांच्यातील अंतर कमी होत नाही.

पूर्वीचे मजुर हे प्रामाणिक होते. मालकाकडे ते सुगीच्या दिवसात दिवसरात्र कष्ट करत असत. सुगी संपेपर्यंत मालक आणि नोकर शेतातच रहात. पाखरे राखणे, कणसं खुडणे, मळणे, वाळवणे, वाऱ्याला देणे एवढे सगळे काम करून सगळे कसे उत्साही रहायचे. जीवापाड कष्ट असे कोणताही काम चुकारपणा नाही. या संदर्भात दिवाकर चौधरी म्हणतात, ''कसं नातं होतं मालकाचं न मजुराईचं तव्हा, हे मले सांग्याचं आहे. तव्हा सारखी ढोर मेहनत पाहिजे असं नाही माह्य म्हणनं पण तव्हा नियत होती आता नियतच बिघडली आहे. आता जर हे नातं जुळलं तरच शेतीले बर्कत यीन. नही तर कितलीबी मशीनरी निंघो जमीनले बर्कत येणान नाही. किसान सुधारणार नही.''[३८] आजच्या काळात परिस्थिती बदलली आहे. पूर्वी सारखे मजूर राहिले नाहीत. कामचुकारपणा वाढला आहे. फक्त दिवस भरणे आणि पैसे घेणे. एवढाच त्यांचे काम आहे. अत्याधुनिक यंत्रसामग्री आल्यामुळे सगळी कामे बिना कष्टाची होऊ लागली आहेत. सालदार मंडळी स्वतःकामे न करता कंबरेवरती हात टेऊन निवांत बांधावरती उभे राहून काम करून घेतात. मालकांच्यापेक्षा त्यांचीच ऐट वाढली आहे.

शेतात मजुर कामाला असल्यावरती दुपारच्यावेळी जेवणाची सुट्टी होई तेव्हा कोणत्या मजुराकडे भाकरी नाही, कोणाकडे कमी आहे, याकडे मालकाचे विशेषतः मालकीणीचे लक्ष असे. असे लोक वेगळेच जेवायला बसत. त्यामुळे मालकीण मजुर जेव्हा शेतात कामाला असत तेव्हा भाजी, भाकरी, कढी, ताक घेऊन येत असे आणि ते मजुरांना देई. हे सर्व मालक, मालकीण मजुरांची किव येते त्यांना पोटभर अन्न नाही. ते गरीब आहेत म्हणून करत नाही तर या संदर्भात दिवाकर चौधरी म्हणतात, ''पण हे सगळं उद्धटपणानं ना होये. एकमेकाईचं एकमेकांवर अशेल प्रेमानं होये.

माणुसकीनं होये. अन् त्याचं कोन्हीच प्रदर्शन बी ना दाखोयत. उपकाराची भाषा ना राहे. पण हे सगळं काही मजुरावऱ्हेच ना बितेत किसानाईवऱ्हे बी बिते. पाऊस नही आला की घ्या उप्पाडीसन् अन् आवढा सगळा गाडा वढनं. मजुराईते चिंता राहे मालकाची एकमेकाईची एकमेकाले गरज आहे हे वयखेल होतं दोन्हीनं माणुसकीतूनच''[३१]

पूर्वी शेतकरी व मजुर या दोघांनाही एकमेकांचे विचार पटत होते. दोघेही जीवला जीव द्यायला तयार असत. एकमेकांच्या सुख दुःखात सहभागी होत. मजुरही मालकाचे भलेच करत कारण मालक सुखी तर आपण सुखी. अशी त्यांची धारणा होती. पण आता काळ बदलला आहे. या दोघांचेही एकमत नसले तरी एकमेकांशिवाय पर्याय नाही हे दोघांनीही जाणले होते. त्यामुळे एखादी गोष्ट मनाला पटली नाही तरी गप्प बसतात. मनापासून नसले तरी वरवरचे का होईना प्रेम दाखवतात. जीवापाड नसले तरी मालकाने बोलवल्यावरती त्यांच्या शेतात कामाला जातात त्यांच्याविषयी आदर दाखवतात. मजुरांना वाटते आपण ज्या पद्धतीने वागतो हे शेतकऱ्याला कळत नाही. परंतु या सर्व गोष्टी मालकांना माहित असतात. शेतकरी ज्या पद्धतीने मजुरांविषयी आत्मीयता दाखवतो. ती देखील औपचारिकच असते. हे देखील मजुरांना माहित असते. तरीसुद्धा ही मंडळी एकमेकांशी राग मनात ठेऊन प्रेमाने वागतात. या रागाच्या, अंतःकरणापासून नसले तरी वरवरच्या प्रेमाच्या या नात्याला काय नाव द्यावे हेच कळत नाही.

**८) समाज व्यवस्थेविषयी भाष्य/संताप व्यक्त :-**

लेखकांनी 'बुझ्र्वागमन' मध्ये समाज व्यवस्थेविषयी संताप व्यक्त केला आहे. कारण या समाजात उच्च-नीच असा भेदभाव केला जातो. कोणत्याही गोष्टीचे खापर वरच्या वर्गातील लोकांच्यावरती फोडले जाते. तसेच समाजातील सर्वच लोक कोणत्याही गोष्टीचे ज्ञान नसताना. त्यावरती आपली मते मांडतात. त्या वस्तुंची प्रत ठरवितात. कोणी हा अधिकार त्यांना दिला? काय हक्क आहे त्यांचा? ज्याने या वस्तु निर्माण केल्या आहेत तोच त्यांच्या किमती, प्रत ठरविणार हे कोण? गरीबांचे चुकले तर त्यांच्याविषयी काहीही बोलायचे नाही. बोलले तर त्यांच्यावरती अत्याचार झाला म्हणून सर्वत्र दंगा करतात. या गोष्टीचा प्रचार करणाऱ्यांवरती जेव्हा ही परिस्थिती

येईल तेव्हा त्यांना या गोष्टीचे गांभीर्य कळेल. अशाच लोकांच्याविषयी भाष्य करण्याचा प्रयत्न लेखकांनी केला आहे.

खरे म्हणजे शेतकरी वर्ग सोडून इतर जे वर्ग आहेत ते खुप चलाख आहेत. कारण त्यांनाच धान्य, भाजीपाला, स्वस्त हवा असतो. म्हणून ते जमीनदारांच्या नावाने ओरडतात. कारण लहान शेतकऱ्यांच्या नावाने ओरडणे शोभत नाही. कारण तुम्ही बुरसटलेल्या विचारांचे आहात असे इतरांना वाटेल म्हणून, जमीनदारांच्या नावाने ओरड करतात. कारण जमीनीमधील माल त्यांना कमी दरात पाहिजे असतो. लहान शेतकऱ्यांना स्वतःचा चरितार्थ चालविणे शक्य नसते. त्यामुळे त्यांच्या नावाने कसे ओरडणार म्हणून जमीनदारांना धरायचे. देशात लोखंड, सोने, कितीही महाग झाले तरी कोणी अजिबात ओरड करत नाहीत. परंतु ज्वारी, गहू, तांदूळ, महागले की झालं प्रसारमाध्यमांसह सगळे ओरडतात. गहू, तांदूळ जसे जीवनाश्यक गोष्टी आहेत तसे इतर वस्तू नाहीत का मग त्यावेळी का नुकसान होऊन बाहेरून येणाऱ्या मालाला चांगला दर मिळू लागला आहे. तेल आणि साखरेवर पैशाचं आणि देशाचं राजकारण चालतं. कारण तेल आणि साखर उत्पादन देशात जास्त प्रमाणात होते. जगाच्या बाजारपेठेत तेल व साखर उत्पादनात भारत आघाडीवर आहे. त्यामुळे या वस्तूपासून मिळणाऱ्या पैशावर आर्थिक उलाढाल चालू असते. देशाच राजकारणही पैशावरच चालते.

समाजामध्ये लोक छानछौकीचे जीवन जगत असतात. शेतीतील उत्पादन काढण्यासाठी किती कष्ट घ्यावे लागते. याचे गांभीर्य त्यांना नाही. तरी देखील तांदूळ, गहू याचे माप काढत असतात. कोणता तांदूळ, गहू चांगला कोणता वाईट कोणता गहू महाग कोणता तांदूळ स्वस्त अशी चर्चा करतात. अशी चर्चा करण्याचा गहू तांदळाची प्रत तपासण्याचा तुम्हाला हक्क कोणी दिला. शेतकऱ्याने उत्पादन काढले आहे. त्याच्या पदरात काही पडो अगर न पडो यांना धान्य स्वस्त मिळाले म्हणजे झाले म्हणून दिवाकर चौधरी म्हणतात, ''एक वर्ष पेरू नका रे, मायचान भो पेरू नका. आवंदाच सगळ गोया करी ठेवा, अन् वर्षभर आपल्या घराघराईले वाटी घ्या. ऐकारे तुम्ही माह्य ऐका! मंग पहा तुम्ही याहींची गमंत'' [४०] लेखकाचे मत अगदी बरोबर आहे. कारण शेतकऱ्यांनी जर स्वतः पुरतेच धान्य पेरले. धान्याची विक्री केली नाही तर मग इतर लोक काय खाणार.

तेव्हा त्यांची अवस्था बघण्यासारखी होईल. त्यांना गव्हाची, तांदळाची किंमत कळेल. महागले, महागले म्हणून ओरड करणार नाहीत. एक वर्ष जर खरेच शेतकऱ्यांनी असे केले तर आम्ही परदेशातून धान्य आयात करू. किती दिवस असे दुसऱ्या देशातून धान्य आयात करणार. आयात केलेले धान्य सर्वानाच परवडेल का? त्याची ग्राहकांपर्यंत पोचेपर्यंत किती दर वाढेल. स्वतःच्या देशातील धान्य परवडत नाही. मग हे आयात केलेले धान्य परवडेल.

पूर्वीचे लोक ताकतवान होते. खाणपिणं पौष्टिक होते. त्यामुळे क्विंटलचे पोते ही ते सहज उचलत. आता मात्र तसे राहिले नाही. आताचे धान्यही पौष्टीक नाही की त्यात कसला कस नाही, चव नाही, हैब्रीडचा जमाना आला आहे. वर्षात तीनचार पीके घेतल्यामुळे त्यात कसलाच दम राहिला नाही. नुसता भुस्सा झालाय त्याचा. या आधुनिक पिढीतील लोक तर पौष्टीक जेवण घेण्यापेक्षा फास्ट फुडच्या मागे लागलेत. तेच त्यांना आवडू लागले आहे. त्यामुळे आजची पिढी नाजूक झाली आहे. पोतभर सोडा पण छोटसं ओझंही ते उचलू शकत नाहीत. जे उचलू शकतात त्यांना इतरांच्यासमोर असं ओझं घेऊन जायची लाज वाटते. अशी विचित्र अवस्था या आधुनिक पिढीची झाली आहे.

शेतीविषयी त्यांना जास्त काही माहित नाही अशा वाचकांना वाटणार काय हे रडगाण परंतु हे रडगाणं नसून वास्तव घटना आहे. शेतकऱ्यांच्या आयुष्यात एका पाठीमागे एक अशा अनेक समस्या त्यांच्या घराच्या वळचणीलाच उभ्या असतात. एक झाली एक लगेच घरात शिरतात. आपल्याला लांबून शुल्लक वाटणाऱ्या गोष्टी प्रत्यक्षात किती अवघडत आहेत. किती हाल सोसावे लागतात. याची जाणीव कोणत्याही कामाच्या प्रत्यक्ष अनुभवानेच होते. शेतकऱ्यांच्या अवस्थेविषयी दिवाकर चौधरी म्हणतात, ''हे अशीच कहाणी आहे किसानाईची, मित्रांनो आम्ही खायाचं म्हणून खातू, पेयाच म्हणून पेतू, हशाच म्हणून हसतू. पण मंधी जर तुम्हन पहाल तर तुम्हाले एकच गोट दिशीन, चिंता. निव्वळ आनंद काय असतो हे आम्हाले माहीत नही. नही म्हणजे निव्वळ निव्वळ आमच्या जोय नही. कोणच्याबी क्रियेले घोर नावाचा फॅक्टर लागेल रहातो, अन् त्याची कारण मीमांसा पाहली त् जास्तीत जास्त गधडीचे हे जबाबदार असता. हाओ, हेच गधडीचे समाजवादाच्या मायची''[४१]

कोणताही शेतकरी आनंदी निवांत मजेत दिसत असला तरी त्याचे मन आतुन चिंतेने पोखरलेले असते. अशी द्विधा अवस्था शेतकऱ्यांची झाली आहे. जो कोणी समाजवादाबद्दल लिहित असेल त्याला जबरदस्ती शेती करायला लावा. आणि दोन–तीन वर्षांनी पुन्हा समाजवादाबद्दल लिहायला सांगा मग समजेल नेमकी परिस्थिती काय आहे. आपण काय लिहित होतो. लांबून पाहून निरीक्षण करून लिहणे आणि प्रत्यक्ष अनुभवाने लिहणे यात जमीन अस्मानाचे अंतर आहे. निरीक्षण करून लिहलेले असते त्यात त्या विषयीचे आनंद, दुःख, वेदना असे काहीच उमटलेले नसते. परंतु प्रत्यक्ष अनुभवाने त्या कामातून निर्माण होणाऱ्या भावना तशाच्या तशा लिहिताना उमटत असतात. जणू काही आपण ते कामच करत अहोत. असा भास निर्माण होतो.

शेतकरी, आपला देश, सुजलाम् सुफलाम् व्हावा असे वाटत असेल तर कोणत्याही गोष्टीत राजकारण करू नका नितिमत्तेने कोणतेही कार्य करा. एखाद्या ठिकाणी तोटा झाला, हरलो म्हणून दुःखी होऊ नका पुन्हा नव्याने लढाईला तयार रहा. समाजातील सर्व लोकांनी शेतकऱ्याला परवडते का ते पहा नाहीतर त्याचा शाप इतर सर्व लोकांना लागेल.

समाजामध्ये लोक एकमेकांवर विश्वास ठेवायला तयार नाहीत. पूर्वीच्या काळी विश्वास नावाची जी चीज होती ती आता फक्त नावालाच राहिली आहे. पूर्वीच्या लोकांचा एकमेकांवरती एवढा विश्वास होता ते त्यासाठी प्राण पणाला लावून तो पाळत. परंतु या आधुनिक जगात लोक एकमेकांवरती विश्वास ठेवायला तयार नाहीत. दोघांच्यामधील विश्वास, एकमेकांचे विचार, जुळतात का या गोष्टींचा विचार न करता मित्राची परिस्थिती कशी काय आहे हे पाहून मैत्री करतात. समजा आपल्यासारखा एखादा गृहस्थ इस्त्री न केलेले कपडे घातलेला; पायी पायी चालत तुमच्याजवळ आला व तो म्हणाला माझी परिस्थिती खूप बिकट आहे. मला पैशाची गरज आहे. आपण मला व्याजाने पैसे द्या. मी वेळेवर परत करीन. यावर आपण म्हणणार व्याजानचं काय मागतायं तसेच दिले असते पण माझ्याजवळ पैसेच नाहीत. तोच जर गृहस्थ तुमच्याजवळ चारचाकी गाडीतून आला तर तुम्ही त्याच्याप्रती थोडासा तरी विचार कराल. अशी या जगाची अवस्था झाली आहे. हे आता सर्वांनी मान्य केले पाहिजे. माणूस एकमेकांवरती विश्वास न ठेवता त्यांच्या परिस्थितीवर विश्वास ठेऊ लागला आहे.

समाजातील लोक धान्य महागले की म्हणतात परवडत नाही. खरचं का परवडत नाही. एकदा तुम्ही स्वतःच्या जेवणाचा खर्च किती होतो याचा हिशोब काढा मग आपल्या लक्षात येईल. आपल्या जेवणाच्या खर्चापेक्षा टि.व्ही., रेडिओ, इतर सुखसुविधा यांचा खर्च किती जास्त आहे त्या किती महाग आहेत हे लक्षात येईल. मग काय परवडते, काय नाही. कोणती गोष्ट महागली, कोणती स्वस्त आहे, याचा अंदाज येईल. अशा अनेक मुद्यातून समाज व्यवस्थेविषयीचा संताप व्यक्त होतो.

**९) सावकार :-**

सावकारांच्या रकमेच्या व्याजाने शेतकऱ्यांचे सर्वच लयाला गेले. बऱ्याच वेळा शेतकऱ्यांनी व्याजाला कंटाळून आत्महत्या केल्या. अशा वेळी सर्वच लोक सावकारांच्या विरोधात उभे राहतात त्यामध्ये प्रसारमाध्यमे, पुढारी, सर्व जनता, नाटक, साहित्य, हिंदी सिनेमा इत्यादी मंडळी समाविष्ट होतात खरचं या सर्व गोष्टींचा विचार केल्यास आपल्याला सावकारांचे महत्त्व समजेल. सावकारांच्या संदर्भात 'आज्ञापत्रात' रामचंद्रपंत अमात्य म्हणतात, ''सावकार म्हणजे राज्याची, राज्यश्रीची शोभाच.'' कारण पूर्वी राज्यात सावकारांना खूप महत्त्व होते. सावकार आपल्या मुलखात असणे म्हणजे राज्याची लक्ष्मी व शोभा वाढते. महसुलात भर पडते. त्यामुळे राज्य आर्थिकदृष्ट्या संपन्न होते.

परंतु कालांतराने परिस्थिती बदलली पूर्वीचे महत्त्व सावकारांना राहिले नाही. सावकार म्हणजे शेतकऱ्यांचे शत्रू बनले. कालांतराने सावकारांची वर्तणूक बिघडू लागली. सावकार वेळेनुसार लोकांना लुबाडू लागले. त्यांचे हाल करू लागले. व्याजापोटी लोकांचे जीवन उद्ध्वस्त करू लागले. त्यामुळे सावकारांवरचा लोकांचा विश्वास उडाला. सावकारांचे समाजातील महत्त्व कमी झाले. गरजेपुरते लोक त्यांना महत्त्व देऊ लागले. तोंडावरती त्यांच्याशी गोड बोलून नंतर त्यांच्या पाठीमागे सावकाराना शिव्या घालू लागले.

सावकार कधीही कोणत्याही शेतकऱ्यांच्या घरी पैसे घेऊन जात नाही. तर शेतकरीच गरज पडल्यावरती सावकारांकडे गरजांची पूर्ती करण्यासाठी जातात. सावकार बँकाप्रमाणे कागदपत्रांचा तगादा लावत नाहीत. कमीत, कमी कागदोपत्री व्यवहारात शेतकऱ्यांना हवी

तेवढी रक्कम देतात. काही वेळा तर कागदपत्रही नसतात अशा अतिशय अडचणीच्या वेळी सावकार शेतकऱ्यांची मदत करतात. आणि शेवटी एवढी मदत करूनही त्यांच्यावरतीच शेतकरी आत्महत्येचे खापर फोडले जाते. शेतकऱ्यांना सावकारांनीच नव्हे तर इतरही अनेक घटकांनी देशोधडीला लावले आहे. सावकारांचे कर्ज शेतकरी वेळ प्रसंगी घेतात. परंतु त्यांच्या व्याजाची रक्कम वेळेवर भरणे त्यांना शक्य होत नाही. कारण शेतकऱ्यांचा प्रपंच एवढा फाटका असतो की एकीकडचे ढिगळ शिवेपर्यंत दुसरीकडे फाटलेले असते. समजा एखाद्या शेतकऱ्याची बऱ्यापैकी परिस्थिती असेल तर, तो कर्ज भरण्याचा प्रयत्न करतो. सगळेच शेतकरी सावकारांच्या कचाट्यात सापडतात असे नाही जो शेतकरी वेळेवर व्याज भरत नाही त्यांची रक्कम चक्रवाढ व्याज पद्धतीने दिवसेंदिवस वाढतच जाते. ती रक्कम एवढी वाढते की शेवटी ती भरणे शेतकऱ्यांना अशक्य होते. काही वेळा सावकारच उलटा-सुलटा हिशोब करून शेतकऱ्यांची गहाणवट असलेली वस्तू, जमीन, घर, काबीज करतात. अशा या सावकारांच्या वागण्यामुळे सिनेमा, साहित्य, नाटक, कादंबऱ्या, सावकारांच्या विरोधात आहेत. सावकारांचे अतिशय सुंदर चित्र त्यांनी रेखाटले आहे. 'शेतकऱ्यांच्या असुड' या ग्रंथात महात्मा फुले यांनी शेतकऱ्यांना सावकार कसे लुटतात याचे वर्णन केले आहे. ते म्हणतात, ''शेतकऱ्यांच्या हालांना पारावार राहिला नाही त्याचा फायदा तत्कालीन सावकार मारवाड्यांनी आणि त्यांना सामील असलेल्या भटब्राह्मणांनी घेतला असून आणि गरजू शेतकऱ्यांना भरमसाठ व्याजाने कर्ज देऊन त्यांची ते लुबाडणूक करू लागले. परिणामतः कसणारा शेतकरी भूमिहीन होऊ लागला. भरमसाठ व्याजामुळे जमिनीचे हस्तांतरण सुलभ आहे.''[४२]

महात्मा फुल्यांनीही सावकारांच्या परिस्थितीचे योग्य शद्वात वर्णन केले आहे. कोणत्याही गोष्टीचा फक्त एका बाजूने विचार करणे चुकीचे असते. सावकारांच्या वर्तनाबाबतीत दुसऱ्या बाजूने विचार केला तर असे निदर्शनास येते सावकार हे प्रत्येक शेतकऱ्यांसाठी फायद्याचे आहेत. शेतकरी आता सुशिक्षित झालेत त्यांनी सावकारांच्या आणि त्यांच्या मध्ये जो व्यवहार झाला आहे तो स्टॅम्प पेपरवरती लिहून घ्यावा. जेणेकरून सावकार त्यात कसलाही बदल करणार नाहीत. वेळेवरती व्याज भरले म्हणजे व्याजाचा आकडा भरमसाठ वाढणार नाही. आणि कर्ज डोईजड होणार नाही. आयत्या वेळी सावकार हवी तेवढी रक्कम शेतकऱ्यांना देतो. त्यामुळे शेतकऱ्यांचे थटलेले काम



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

पटकन होते. पैशासाठी काही विकायची गरज भासत नाही. उत्पादन निघाले की सावकाराचे पैसे थोडे थोडे भागवून टाकायचे. म्हणजे व्याजाचा आकडा फुगत नाही.

काळ बदलेल तसा सावकारांच्यात खूप बदल झाले. पूर्वीच्या सावकारात आणि आताच्या सावकारात खूप फरक आहे. पूर्वीच्या सावकाराना जो मान, सन्मान होता तो कमी झाला आहे. मधल्या काळात तर सावकारकी खूप क्रूर बनली होती. त्यामुळे त्यांचा दर्जा खालवला होता. आजच्या काळात परिस्थिती चांगली आहे परंतु सावकारांच्यावरती सावकारकी करू नये म्हणून कडक बंधने आहेत. तसे समजल्यास सावकारांनाच अटक केली जात असते.

**१०) शैक्षणिक समस्या :-**

शेतकऱ्यांच्या मुलांमध्ये शिक्षणाची समस्या अतिशय बिकट झाली आहे. पूर्वी शेतकऱ्यांची मुले शिक्षण घेत नव्हती म्हणून ती अडाणी होती. परंतु आता परिस्थिती अशी झाली आहे. शेतकरी जीवापाड कष्ट करून प्रसंगी पोटाला चिमटा घेऊन मुलांना शाळा शिकवतात. का तर आपल्यासारखे आपल्या मुलाचे हाल होऊ नयेत. आजची मुले शिकली परंतु झाले मात्र उलटेच मुले दारोदार पदव्यांची कागद घेऊन फिरू लागली. नोकऱ्यांचा प्रश्न निर्माण झाला. ती मुले नोकरी नाही, शेती करणे जमत नाही म्हणून मोकळीच भटकू लागली. एका वेगळ्याच मानसिक दडपणाखाली वावरू लागलीत. त्यामुळे घरच्यांच्या जीवाला काळजीचा घोर लागला. समाजात एक नवीन समस्या निर्माण झाली.

शेतकऱ्यांच्या मुलांच्या लग्नाचा प्रश्नही बिकट झाला आहे. शेतकऱ्यांच्या मुलांना कोणी मुली द्यायला तयार नाही. शेतकऱ्यांच्या घरी ट्रॅक्टर, गाडी, बंगला असला तरी त्यांच्या मुलांना मुली देताना लोक दहा वेळा विचार करतात. उलट पगारदार मुलांकडे पगार सोडून काहीही नसले तरी त्यानाच मुली देतात का तर हक्काने महिन्याच्या महिन्याला पैसे येतात. इकडे काहीही उलाढाल होवो पगार महिन्याला मिळतोय म्हणून शिपाई चालतो, परंतु शेतकरी नको अशी मानसिकता रूजत आहे. आजकाल बागायत जमीन असून देखील त्या जमिनीला किंमत नाही. शेतकऱ्यांची मुले शिकलेली नसल्यामुळे ती नोकरी करू शकत नाहीत आणि जी शिकलेली आहेत ती नोकरी नाही

म्हणून शेती करतात. या संदर्भात दिवाकर चौधरी म्हणतात, ''नहीत पहिलेन म्हण्याचे, उत्तम शेती..... मध्यम व्यापार..... कनिष्ठ नोकरी पण टाईमच बदलला. कशाची उत्तम शेती? उत्तम नोकरी... मध्यम व्यापार..... कनिष्ठ शेती.''(४३) अशी परिस्थिती आजकाल निर्माण झाली आहे. म्हणून भरपूर मुलांनी शिक्षण घेतले. शेतकऱ्यांनी आपली ऐपत नसताना वेळ प्रसंगी जमीन विकून, रोजगार करून मुलांना शिकवले , त्यामुळे सुशिक्षित बेकारीचा भीषण प्रश्न निर्माण झाला आहे. जो-तो नोकरीच्या पाठीमागे वणवण भटकू लागला आहे. पूर्वीच्या काळी गावात जमीनदारांना महत्व होते. त्यांना लोक भिऊन असत. आता मात्र जमाना बदलला आहे. जमीनदारांना किंनत राहिली नाही. शेतकऱ्यांना झाडू मारणाऱ्या कामगारापेक्षा कमी किंमत झाली आहे. कमी का असेना त्याचा पगार महिन्याच्या महिन्याला मिळतो. शेतकऱ्यांचे मात्र हंगामानुसार पैसे येतात. त्यात पुन्हा फायदा का तोटा ते त्यावेळेनुसार ठरतो. शेतकऱ्यांचे मात्र तसे नाही, नैसर्गिक आपत्ती, मार्केटमध्ये उलाढाल, दंगल झाली तरी त्यांचा तोटा होतो. वेळोवेळी अशा अनेक समस्यांमुळे शेतकरी आर्थिक परिस्थितीने मोडकळीस येतो. त्यामुळे मुलीचे वडिल शेतकरी मुलांना मुली द्यायला तयार नाहीत या संदर्भात क्षितिज पाटुकले म्हणतात, ''ज्याप्रमाणे स्वातंत्र्यवीर सावरकरांनी स्वातंत्र्यपूर्वकाळातील साहित्य संमेलनात आवाहन केले होते की, नोकऱ्यांचा नाद सोडा आणि स्वतःचे उद्योग उभारा.''४४ सावरकरांच्या उपदेशानुसार एकविसाव्या शतकाकडे वाटचाल करणाऱ्या या मुलांनी उच्चशिक्षण घेऊन नोकरीच्या नादी न लागता स्वतःचा उद्योगधंदा उभा केला पाहिजे. नोकरीसाठी कोणाच्या पाया न पडता व्यवसायातून स्वतःचे कर्तृत्व सिद्ध केले पाहिजे. आणि समाजात स्वतःचा ठसा उमटविला पाहिजे. म्हणजे कोणाचीही तुमच्या विरूद्ध बोलण्याची ताकत होणार नाही. समाजात तुम्हाला शेतकऱ्याचे पोर म्हणून हिणवले जाणार नाही. मुलांनीही शिकले, सवरले, व्यवसायिक झाले म्हणून आपल्या काळ्याआईला मात्र विसरता कामा नये. नाहीतर त्यांच्या सारखे दुर्दैवी तेच !

शेतकरी रात्रंदिवस कष्ट करतो. त्या कष्टाच्या बदल्यात शेतीतून त्याला किती मोबदला मिळतो. तसेच कष्ट करत असताना त्याला अनेक संकटांना सामोरे जावे लागत असते. याचा एक आराखडा येथे मांडण्याचा प्रयत्न केला आहे. शेतकरी कुटुंबातील प्रत्येकाला या कष्टाचे चटके सहन करावे लागतात. वर्षभर कष्ट करून मिळालेले उत्पन्न नगण्य स्वरूपाचे असते. आपल्या

सारख्यांना वाटेल शेतकऱ्यांच्या आयुष्यात सारखीच संकटे असतात का? सुख कधीच असत नाही. तर ते तसे नाही. शेतकरी सुद्धा आहे त्या उत्पन्नात सुखी राहू शकतो. परंतु आजुबाजूने लोक त्याला सुखी जीवन जगू देत नाहीत कारण वेळोवेळी त्याची फसवणूक करून त्यांना लुबाडत असतात. अशा लुटारू लोकांच्यामुळे शेतकरी दुर्बल झाले आहेत. या संदर्भात श्री. टी. एस. मोटे यांनी तुकारामांच्या अभंगाचे स्पष्टीकरण सांगितले आहे ते म्हणतात, ''बैल आपल्या पाठीवर साखर वाहतो पण त्याला ती थोडीच खायला मिळते? त्याच्या नशिबी कडबाच. उंट मालाच्या पेट्या वाहतो परंतु त्याला काटेच खावे लागतात. शेतकऱ्यांची परिस्थिती शतकानुशतके बैल व उंटासारखी आहे. स्वतः समाजाच्या गरजा भागवता भागवता तो दरिद्रीच राहिला. जगाची अनंत काळापासून सेवा करणारा सर्वात मोठा समाजसेवक, सतत कर्तव्य करणारा, लाखांचा पोशिंदा, पृथ्वीतलावरील सर्वात कष्टाळू प्राणी, मात्र निसर्ग, कर्मकांड, राजनिती इ. सर्व बाजूंनी नागवला जातो. बहुजन शेतकऱ्यांची या जाचातून सोडवणूक करणारा आधुनिक तुकाराम जन्माला येईल का?''[४५]

शेतकऱ्यांच्या जीवनातील मांडलेल्या प्रश्नांचा गुंता हा कधीतरी सुटला पाहिजे. त्यासाठी प्रत्येकाने प्रयत्न केले पाहिजेत. शेतकरी जर पिढ्यान्‌पिढ्या असाच अगतिक लाचार दुःखी जीवन जगत राहिला तर त्याचे शेतीवरचे प्रेम उडेल. भविष्यात त्यांची मुले शेती करणे सोडून देतील. सर्वांच्याच अन्नाचा प्रश्न निर्माण होईल. त्यासाठी सर्वात प्रथम सरकारने शेतकऱ्यांच्या प्रगतीसाठी ठोस पाऊले उचलली पाहिजेत. शेतकऱ्यांना या विळख्यातून सोडवले पाहिजे. शेतकऱ्यांनीही सर्व गोष्टींसाठी इतरांवरती अवलंबून न रहाता स्वतःही प्रयत्न केले पाहिजेत. आपल्या मुलांना शिकवून नोकरी लावली पाहिजे. किंवा छोटा–मोठा व्यवसाय काढून दिला पाहिजे. त्यांना स्वतःच्या पायावरती उभे करून स्वावलंबी केले पाहिजे. म्हणजे कुटुंबातील एक जरी व्यक्ती नोकरी करत असेल इतर लोक शेती करत असतील. तरीही त्यांचे कुटुंब व्यवस्थित चालू शकेल. शेतकऱ्यांनी फक्त शेतीवरती अवलंबून न रहाता शेतीला पुरक जोडधंदा केला पाहिजे. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे सर्व शेतकऱ्यांनी मिळून एक संघटना केली पाहिजे. म्हणजे त्यांचे हक्क त्यांना मिळतील. म्हणूनच बळीराजा सुखी तर देश आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होऊन सुजलाम् सुफलाम् होईल.

# संदर्भ


१) शरणकुमार लिंबाळे – साठोत्तरी मराठी वाड्.मयातील प्रवाह, दिलीपराज प्रकाशन, पुणे. पृ. ८९

२) सतीश जाधव – झळ, शद्व प्रकाशन, प्र. आ. डिसें. २००३, पृ.

३) नागनाथ कोतापल्ले – ग्रामीण साहित्य स्वरूप आणि शोध, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, पृ. ३३

४) तत्रैव –ग्रामीण साहित्य स्वरूप आणि शोध, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, पृ. ३४

५) मुकुंदराव गायकवाड – बळीराजा, कृषि विज्ञान प्रकाशन, पुणे नोव्हेंबर २००६, पृ. १४४

६) श्री. अरविंद नळकांडे – बळीराजा, कृषि विज्ञान प्रकाशन, पुणे नोव्हेंबर २००६, पृ. २६

७) दिवाकर चौधरी – बुझ्र्वागमन, अनुबंध प्रकाशन, पुणे प्र. आ. २६ जाने. २००७, पृ. १०६

८) श्रीराम गुंदेकर – अनुबंध प्रकाशन, पुणे प्र आ. २६ जाने. २००७, पृ. २९

९) प्रा. चंद्रकांत खंडागळे – ग्रामीण समाजशास्त्र, सौ. मायादेवी खंडागळे, सांगली प्र. आ. ऑक्टो. २००५ , पृ. ४९

१०) दिवाकर चौधरी – बुझ्र्वागमन, अनुबंध प्रकाशन, पुणे प्र. आ. २६ जाने. २००७, पृ. १२

११) तत्रैव – बुझ्र्वागमन, अनुबंध प्रकाशन, पुणे प्र. आ. २६ जाने. २००७, पृ. १४

१२) तत्रैव – बुझ्र्वागमन, अनुबंध प्रकाशन, पुणे प्र. आ. २६ जाने. २००७, पृ. १५

१३) तत्रैव – बुझ्र्वागमन, अनुबंध प्रकाशन, पुणे प्र. आ. २६ जाने. २००७, पृ. ३१

१४) तत्रैव – बुझ्र्वागमन, अनुबंध प्रकाशन, पुणे प्र. आ. २६ जाने. २००७, पृ. ४०

१५) डॉ. बी. बी. पवार. – बळीराजा, कृषि विज्ञान प्रकाशन, पुणे, ऑक्टोबर २००७, पृ. ५८

१६) दिवाकर चौधरी – बुझ्र्वागमन, अनुबंध प्रकाशन, पुणे प्र. आ. २६ जाने. २००७, पृ. १७५

१७) तत्रैव – बुझ्र्वागमन, अनुबंध प्रकाशन, पुणे प्र. आ. २६ जाने. २००७, पृ. ८१

१८) रा. र. बोराडे – लेखकांना आत्मभान देणारी चळवळ, (लेखक वासुदेव मुलाठे – ग्रामीण साहित्य चळवळ आणि आम्ही), पृ. ५४

१९) प्र. बा. भोसले – बळीराजा, कृषि विज्ञान प्रकाशन, पुणे जुलै २००७, पृ. १०

२०) श्री. बोकरे –बळीराजा, कृषि विज्ञान प्रकाशन, पुणे नोव्हेंबर २००६, पृ. १४४




BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

२१) श्री. वसंत फुटाणे – बळीराजा, कृषि विज्ञान प्रकाशन, पुणे ऑक्टो. २००६, पृ. ११०

२२) आनंद यादव – ग्रामसंस्कृती, नवरूपवती, नवधान्यवती मेहता पब्लिकेशन, पुणे, प्र. आ. जाने. २०००, पृ. ११५

२३) दिवाकर चौधरी – बुझ्र्वागमन, अनुबंध प्रकाशन, पुणे प्र. आ. २६ जाने. २००७, पृ. १५५/१५६

२४) श्री. वसंत फुटाणे – बळीराजा, कृषि विज्ञान प्रकाशन, पुणे ऑक्टो. २००६, पृ. ११०

२५) दिवाकर चौधरी – बुझ्र्वागमन, अनुबंध प्रकाशन, पुणे प्र. आ. २६ जाने. २००७, पृ. १६४

२६) मोहन शंकर देशपांडे –ऋषीकृषि, कोठे होते बेनॉर सौ. पुष्पा मोहन देशपांडे, खेडे आजरा, जि. कोल्हापूर प्र. आ. जाने. १९९६, पृ. ५३

२७) मोहन शंकर देशपांडे – ऋषीकृषि, नैसर्गिक शेती–सर्वांगीण विकासाची दिशा, प्र. आ. जाने. १९९६, पृ. ३५

२८) दिवाकर चौधरी – बुझ्र्वागमन, अनुबंध प्रकाशन, पुणे प्र. आ. २६ जाने. २००७, पृ. १५७

२९) मोहन शंकर देशपांडे – ऋषीकृषि, नैसर्गिक शेती– सर्वांगीण विकासाची दिशा,प्र. आ. जाने. १९९६, पृ. ३५

३०) दिवाकर चौधरी – बुझ्र्वागमन, अनुबंध प्रकाशन, पुणे प्र. आ. २६ जाने. २००७, पृ. ५७

३१) श्रीकांत करे – बळीराजा, कृषि विज्ञान प्रकाशन, पुणे ऑक्टो. २००७, पृ. १८

३२) प्र. बा. भोसले – बळीराजा, कृषि विज्ञान प्रकाशन, पुणे जुलै २००७, पृ. ८७

३३) आ. व्ही. चवरे – बळीराजा, कृषि विज्ञान प्रकाशन, पुणे जुन २००७, पृ. १५

३४) वासुदेव मुलाठे – ग्रामीण साहित्य, (लेखक–डॉ. शरणकुमार लिंबाळे – साठोत्तरी मराठी वाङ्मयातील प्रवाह), दिलिपराज प्रकाशन पुणे, पृ. ८०

३५) दिवाकर चौधरी – बुझ्र्वागमन, अनुबंध प्रकाशन, पुणे प्र. आ. २६ जाने. २००७, पृ. ६३

३६) तत्रैव – बुझ्र्वागमन, अनुबंध प्रकाशन, पुणे प्र. आ. २६ जाने. २००७, पृ. १४

३७) तत्रैव – बुझ्र्वागमन, अनुबंध प्रकाशन, पुणे प्र. आ. २६ जाने. २००७, पृ. ११८

३८) तत्रैव – बुझ्र्वागमन, अनुबंध प्रकाशन, पुणे प्र. आ. २६ जाने. २००७, पृ. १३७

३९)    तत्रैव –बुझ्र्वागमन, अनुबंध प्रकाशन, पुणे प्र. आ. २६ जाने. २००७, पृ. १५२

४०)    तत्रैव – बुझ्र्वागमन, अनुबंध प्रकाशन, पुणे प्र. आ. २६ जाने. २००७, पृ. ३०

४१)    तत्रैव – बुझ्र्वागमन, अनुबंध प्रकाशन, पुणे प्र. आ. २६ जाने. २००७, पृ.

४२)    महात्मा फुले – शेतकऱ्यांचा आसुड, मेहता पब्लिकेशन, पुणे, पृ. ५

४३)    दिवाकर चौधरी – बुझ्र्वागमन, अनुबंध प्रकाशन, पुणे प्र. आ. २६ जाने. २००७, पृ. १०

४४)    क्षितिज पाटुकले – बळीराजा, कृषि विज्ञान प्रकाशन, पुणे, नोव्हेंबर २००६, पृ. २४

४५)    श्री. टी. एस. मोटे – बळीराजा, कृषि विज्ञान प्रकाशन, पुणे, नोव्हेंबर २००६, पृ. १३९

*****